मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ९८ ■ मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# राज्यातील २९ महानगरपालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान व १६ जानेवारीला मतमोजणी

**मुंबई :** बृहन्मुंबईसह राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी 15 जानेवारी 2026 रोजी मतदान; तर 16 जानेवारी 2026 रोजी मतमोजणी होईल. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 227 जागांसह एकूण 2 हजार 869 जागांसाठी ही निवडणूक होत आहे. या सर्व महानगरपालिकांच्या क्षेत्रांत आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. येथील सह्याद्री अतिथिगृहात महानगरपालिका निवडणुकांच्या कार्यक्रमाची घोषणा करण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत श्री. वाघमारे बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. श्री. वाघमारे यांनी सांगितले की, सर्व महानगरपालिकांची निवडणूक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या आधीन राहून राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना 16 डिसेंबर 2025 रोजी प्रसिद्ध होईल. उर्वरित सर्व 28 महानगरपालिकांची अधिसूचना 18 डिसेंबर 2025 रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. अधिसूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित महानगरपालिका आयुक्त आपापल्या स्तरावर पार पाडतील. सर्व महानगरपालिकांसाठी 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल.

**महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल. त्याचबरोबर 4 नोव्हेंबर 2025 रोजी कायदा व सुव्यवस्थेसंदर्भातदेखील आदेश निर्गमित केले आहेत.

**महानगरपालिकांची नावे**

राज्यातील 29 महानगरपालिकांपैकी जालना आणि इचलकरंजी या 2 नवनिर्मित महानगरपालिका आहेत. 5 महानगरपालिकांची मुदत 2020 मध्ये संपली आहे. सर्वाधिक 18 महानगरपालिकांची मुदत 2022 मध्ये संपली होती; तर 4 महानगरपालिकांची मुदत 2023 मध्ये संपली आहे. मुदत समाप्तीची महानगरपालिकानिहाय तारीख अशी: छत्रपती संभाजीनगर: 27 एप्रिल 2020, नवी मुंबई: 07 मे 2020, वसई- विरार: 28 जून 2020, कल्याण-डोंबिवली: 10 नोव्हेंबर 2020, कोल्हापूर: 15 नोव्हेंबर 2020, नागपूर: 04 मार्च 2022, बृहन्मुंबई: 07 मार्च 2022, सोलापूर: 07 मार्च 2022, अमरावती: 08 मार्च 2022, अकोला: 08 मार्च 2022, नाशिक: 13 मार्च 2022, पिंपरी- चिंचवड: 13 मार्च 2022, पुणे: 14 मार्च 2022, उल्हासनगर: 04 एप्रिल 2022, ठाणे: 05 एप्रिल 2022, चंद्रपूर: 29 एप्रिल 2022, परभणी: 15 मे 2022, लातूर: 21 मे 2022, भिवंडी- निजामपूर: 08 जून 2022,




मालेगाव: 13 जून 2022, पनवेल: 9 जुलै 2022, मीरा- भाईंदर: 27 ऑगस्ट 2022, नांदेड- वाघाळा: 31 ऑक्टोबर 2022, सांगली- मीरज- कुपवाड: 19 ऑगस्ट 2023, जळगाव: 17 सप्टेंबर 2023, अहिल्यानगर: 27 डिसेंबर 2023, धुळे: 30 डिसेंबर 2023, जालना: नवनिर्मित आणि इचलकरंजी: नवनिर्मित.

**बहुसदस्यीय पद्धत**

बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व 28 महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेत एका प्रभागातून एकच सदस्य निवडून द्यावयाचा असल्याने प्रत्येक मतदाराला केवळ एकच मत द्यावे लागेल. उर्वरित सर्व 28 महानगरपालिकांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात साधारणत: चार जागा असतील काही महानगरपालिकांच्या काही प्रभागांत तीन अथवा पाच जागा असतील. त्यानुसार बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व महानगरपालिका निवडणुकांमध्ये प्रत्येक मतदाराने किमान 3 ते 5 मते देणे अपेक्षित असेल.

**नामनिर्देशनपत्रे ऑफलाईन पद्धतीने**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे; परंतु विविध राजकीय पक्ष आणि नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांतील उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकीत पारंपरिकरीत्या ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतील.

**'जातवैधता पडताळणी'बाबत**

राखीव जागांवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. जात प्रमाणपत्र असेल; परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा देणे आवश्यक राहील. "सहा महिन्यांच्या कालावधीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यात येईल," असे हमीपत्रदेखील संबंधित उमेदवारांना द्यावे लागेल. या विहित मुदतीत म्हणजे निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न करू शकलेल्या संबंधित उमेदवाराची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल.

**मतदान केंद्र आणि ईव्हीएम**

महानगरपालिका निवडणुकांसाठी एकूण 3 कोटी 48 लाख 78 हजार 17 मतदार असून त्यासाठी सुमारे 39 हजार 147 मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात 43 हजार 958 कंट्रोल युनिट आणि 87 हजार 916 बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सुमारे 10 हजार 111 मतदान केंद्रांसाठी 11 हजार 349 कंट्रोल युनिट आणि 22 हजार 698 बॅलेट युनिटची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**संभाव्य दुबार मतदारांबाबत दक्षता**

भारत निवडणूक आयोगाने तयार केलेल्या विधानसभा मतदारसंघाच्याच मतदार याद्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवणुकांसाठी वापरल्या जातात. संबंधित कायद्यांतील तरतुदींनुसार राज्य निवडणूक आयोगाने 1 जुलै 2025 हा अधिसूचित दिनांक निश्चित करून, त्या दिवशी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघाच्या याद्या महानगरपालिका निवडणुकांसाठी प्रभागनिहाय विभाजित केल्या आहेत. या याद्यांतील नावे वगळण्याचा किंवा नव्याने नावे समाविष्ट करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही; परंतु त्यातील दुबार नावांबाबत मात्र राज्य निवडणूक आयोगाने पुरेपूर दक्षता घेण्याचा प्रयत्न केला आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या आज 15 डिसेंबर 2025 रोजी प्रसिद्ध झाल्या आहेत. मतदान केंद्राच्या ठिकाणांची (इमारती) यादी 20 डिसेंबर 2025 रोजी; तर मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या 27 डिसेंबर 2025 रोजी प्रसिद्ध केल्या जातील. मतदार याद्यांतील संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त त्यांच्या स्तरावर कार्यवाही करीत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली (ॲप्लिकेशन) विकसित केली आहे. इतरही महानगरपालिकांनी विविध तंत्रांचा वापर करून संभाव्य दुबार नावांबाबत दक्षता घेतली आहे.महानगरपालिकेच्या प्रभागनिहाय मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर (**) असे चिन्ह नमूद करण्यात आले आहे. असे मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहेत, याबाबत त्यांना आवाहन करण्यात आले. घरोघरी जाऊनही त्यांची पडताळणी केली आणि त्यांच्याकडून असा मतदार कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घेण्यात आला आहे. त्याने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही; परंतु काही कारणाने असा अर्ज भरून घेतला नसल्यास संभाव्य दुबार नाव असलेला मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. त्याचबरोबर त्याची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्याची मुभा देण्यात येईल.

**'मताधिकार' मोबाईल ॲप**

महानगरपालिका निवडणुकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती जाणून घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'मताधिकार' हे मोबाईल ॲप उपलब्ध करून दिले आहे. ते सध्या फक्त 'गुगल प्ले स्टोअर'वरून डाऊनलोड करता येईल. या ॲपद्वारे मतदाराचे नाव शोधण्यासाठी मतदाराला दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यानुसार मतदाराचे 'संपूर्ण नाव' किंवा 'मतदार ओळखपत्रा'चा (EPIC) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यानंतर जिल्हा आणि महानगरपालिकेच्या नावाची निवड केल्यानंतर आपले नाव दिसेल. याच ॲपच्या माध्यमातून आपले मतदान केंद्राचे ठिकाणही कळू शकेल. त्याचबरोबर आपल्या प्रभागातील उमेदवाराविषयी अधिक माहितीदेखील जाणून घेता येईल. मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahasecvoterlist.in/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करून दिले आहे. त्यातील Search Name in Voter List वर क्लिक करून ॲपप्रमाणे 'नाव' किंवा 'मतदार ओळखपत्रा'चा (EPIC) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल.

**मतदार जागृती**

महानगरपालिका निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मोठ्याप्रमाणावर मतदार जागृती करण्याचे आदेश सर्व महानगरपालिका आयुक्तांना दिले आहेत. पारंपरिक प्रसारमाध्यमांबरोबरच नवीन माध्यमांचा कौशल्यपूर्ण वापर करण्याबाबत आयोगाने 12 जून 2025 रोजी पत्राद्वारे सर्वांना निर्देश दिले आहेत. त्याबाबत वेळोवेळी आढावाही घेण्यात आला आहे. मतदार जागृतीसंदर्भातील सर्व सूचना व निर्देश मार्गदर्शक स्वरुपात असून, स्थानिक पातळीवर काही नावीन्यपूर्ण उपक्रम सूचल्यास तेही आपापल्या स्तरावर राबविण्याबाबत कळविण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या पातळीवरूनही समाजमाध्यमांसह विविध माध्यमांसह विविध माध्यमांद्वारे मतदार जागृती करण्याचा प्रयत्न असेल. विशेषत: बृहन्मुंबईसह मोठ्या महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अधिक प्रमाणात मतदार जागृतीवर भर देण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने महानगरपालिका स्तरावर नियोजन केले जाईल.

ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगासाठी मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पूर्ती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. सर्व मतदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकच असेल; परंतु याशिवाय शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी- कर्मचारी व पोलिस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल.

**मनुष्यबळाची व्यवस्था**

महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी सुमारे 290 निवडणूक निर्णय अधिकारी आणि सुमारे 870 सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून, त्याची पूर्तता करण्यात आली आहे. साधारणत: सुमारे 1 लाख 96 हजार 605 इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांची गरज भासेल, तीदेखील व्यवस्था झाली आहे. आवश्यक तेवढ्या मनुष्यबळाच्या उपलब्धतेबाबत महसूल विभागीय आयुक्त आणि सर्व महानगरपालिका आयुक्त यांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत; तसेच त्यासंदर्भात वेळोवेळी संबंधितांच्या बैठकाही घेण्यात आल्या आहेत.

**प्रचार समाप्तीनंतर जाहिरातींना बंदी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचार समाप्तीसंदर्भात संबंधित विविध अधिनियमांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी आहेत. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमांसह कुठल्याही माध्यमाद्वारे प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येत नाहीत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम '27अअ' आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 14(4) अन्वये महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठीच्या मतदान समाप्तीच्या 48 तास अगोदर प्रचारावर निर्बंध असतात. त्यामुळे 15 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता मतदानाची वेळ संपत असल्याने 13 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता जाहीर प्रचाराची समाप्ती होईल. त्यामुळे 13 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 नंतर जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारणसुद्धा करता येणार नाही.

**माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती**

महानगरपालिकेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच संबंधित महानगरपालिका आयुक्त आपल्या स्तरावर राज्य निवडणूक आयोगाच्या 9 ऑक्टोबर 2025 रोजीच्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, 2025' नुसार 'महानगरपालिकास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती' स्थापन करतील. महानगरपालिका आयुक्त स्वत: या समितीचे अध्यक्ष; तर महानगरपालिकेचा जनसंपर्क अधिकारी सदस्य सचिव असेल. ही समिती प्रचारविषयक इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी/ प्रकरणांची चौकशी, त्यांचे निराकरण; तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि देखरेख करेल. राज्य निवडणूक आयोगाच्या स्तरावर आयोगाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती' कार्यरत असेल.

**प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रवेशिका**

राज्य निवडणूक आयोगाच्या 9 ऑक्टोबर 2025 रोजीच्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, 2025' च्या परिच्छेद 20 नुसार संबंधित महानगरपालिका आयुक्तांच्या स्तरावरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रावरील प्रवेशासाठी प्रवेशिका दिल्या जातील. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकांसाठीदेखील बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्याच स्तरावरून प्रवेशिका देण्यात येतील.

**राजकीय पक्षांशी वेळोवेळी संवाद**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वेळोवेळी राजकीय पक्षांशी संवाद साधण्यात आला आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या आतापर्यंत तीन बैठका घेण्यात आल्या आहेत. या बैठका 14 ऑक्टोबर 2025, 01 डिसेंबर 2025 आणि 12 डिसेंबर 2025 रोजी पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी, बहुसदस्यीय पद्धत, विविध न्यायालयांचे आदेश, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था, ईव्हीएमसाठीच्या स्ट्राँग रूमची निगराणी इत्यादींबाबत बैठकीला उपस्थित राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना अवगत करण्यात आले आहे. त्यांच्या मागणीनुसार नामनिर्देशनपत्रासोबत दाखल करावयाच्या 'जोडपत्र- 1' आणि 'जोडपत्र-2' बाबत अधिक स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्याचबरोबर मुख्य प्रचारकांची (स्टार कॅम्पेनर) संख्या 20 वरून 40 करण्यात आली आहे

मतदार व मतदान केंद्र

- पुरुष मतदार- 1,81,93,666
- महिला मतदार- 1,66,79,755
- इतर मतदार- 4,596
- एकूण मतदार- 3,48,78,017
- एकूण मतदान केंद्र- 39,147

जागा व आरक्षित जागा

- महानगरपालिकांची संख्या- 29
- एकूण प्रभाग-893
- एकूण जागा- 2,869
- महिलांसाठी जागा- 1,442
- अनुसूचित जातींसाठी जागा- 341
- अनुसूचित जमातींसाठी जागा- 77
- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा- 759

उमेदवारांसाठी खर्च मर्यादा

- बृहन्मुंबई आणि 'अ' वर्ग महानगरपालिका (पुणे व नागपूर)- रु. 15,00,000/-
- 'ब' वर्ग महानगरपालिका (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे) - रु. 13,00,000/-
- 'क' वर्ग महानगरपालिका (कल्याण-डोंबिवली, नवी मुबई, छ. संभाजीनगर व वसई-विरार)- रु. 11,00,000/-
- 'ड' वर्ग महानगरपालिका (उर्वरित सर्व 19)- रु. 09,00,000/-

महत्वाच्या तारखा

- नामनिर्देशनपत्र स्वीकारणे- 23 डिसेंबर 2025 ते 30 डिसेंबर 2025
- नामनिर्देशनपत्रांची छाननी - 31 डिसेंबर 2025
- उमेदवारी माघारीची अंतिम मुदत- 02 जानेवारी 2026
- निवडणूक चिन्ह वाटप- 03 जानेवारी 2026
- अंतिम उमेदवारांची यादी- 03 जानेवारी 2026
- मतदानाचा दिनांक- 15 जानेवारी 2026
- मतमोजणीचा दिनांक- 16 जानेवारी 2026

# शांतिवन पोरके झाले : महेंद्रशेठ घरत; रक्षाबेन मेहता यांना महेंद्रशेठ घरत यांची भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** शांतिवन हे कुष्ठरुग्णांसाठी संजीवनी आहे. गेली अनेक दशके शांतिवनच्या माध्यमातून समर्पित भावनेने रक्षाबेन मेहता यांनी कुष्ठरुग्ण आणि आदिवासी बांधवांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण केले. सेवाभावी वृत्तीने एखादी संस्था उभी करणे आणि ती चालविणे, हे सोपे काम नाही. रक्षाबेन मेहता यांनी ते करून दाखविले. शांतिवनच्या त्या आधारवड होत्या. त्यामुळे त्यांच्या निधनाने शांतिवन आता पोरके झाले आहे," अशा भावना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे



रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी दिवंगत रक्षाबेन मेहता यांना श्रद्धांजली वाहताना व्यक्त केल्या. रविवारी (ता. १४) शांतिवनच्या आवारात दिवंगत रक्षाबेन मेहता यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यावेळी महेंद्रशेठ यांनी आपले मन मोकळे केले.

शांतिवन येथील कुष्ठरोग निवारण समितीच्या अध्यक्षा रक्षाबेन मेहता यांचे ६ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रविवारी (ता.१४) शोकसभा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी रक्षाबेन मेहता यांच्या सुकन्या फाल्गुनी मेहता, माजी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी, कार्याध्यक्ष प्रमोद ठाकूर, कार्यवाह अजय शिर्के, मोतीलाल बांठिया आणि शांतिवनचे कर्मचारी, कुष्ठरुग्ण आणि त्यांच्यावर प्रेम करणारे अनेक जण उपस्थित होते.

रक्षाबेन मेहता या वक्तशीर होत्या, सामान्यांपेक्षा सामान्य जीवन जगल्या. त्यांच्यात कमालीचा साधेपणा होता. अनेक आदिवासी वाड्यांचा त्यांनी कायापालट केला. आदिवासी महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवण्याचे मोठे काम त्यांनी केले. परिसरातील ५०० च्या आसपास आदिवासी मुले आज शिकत आहेत, ती केवळ त्यांच्या दूरदृष्टीमुळे, अशा प्रकारच्या भावना अनेक मान्यवरांनी रक्षाबेन मेहता यांना श्रद्धांजली वाहताना व्यक्त केल्या. 'वैष्णव जण तो' हे भजन यावेळी सादर करण्यात आले. त्यानंतर रक्षाबेन मेहता यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# विक्रोळीकरांच्या एकीने कचऱ्याच्या गाड्या हटविल्या

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** स्थानिक काही विक्रोळीकर नागरिकांच्या एकीने आणि पाठपुरवठ्याने विक्रोळी पूर्व दु-गती मार्ग उड्डाणपूल खाली,अनधिकृतपणे लावलेल्या कचऱ्याच्या गाड्या मुंबई महानगर पालिका एन वॉर्ड च्या भ्रष्ट अधिकाऱ्यांना काढाव्या लावल्या.. असेच जर सर्व नागरिक, रहिवासी, सामाजिक संस्था, संघटना, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते एकत्र येऊन एकमेकाच्या सहकार्याने कोणतेही मतभेद न ठेवता कामे केली तर प्रशासनाला माघार घ्यावीच लागते. हा विक्रोळीकरांचा विजय आहे या मोहिमेत राजाराम राव,आयवन डिसोझा,राहुल



वाघधरे.रॉबर्ट डिसोझा,दिनेश बेरीशेट्टी आणि काही सोबतचे स्थानिक नागरिक यांचा सहभाग आहे.

# सांता सादरीकरणाच्या नावाखाली परकीय आकर्षण

## बालमनावर होणारा वैचारिक हस्तक्षेप थांबलाच पाहिजे

**दैनिक युवक आधार**

**आसाराम विरकर :** कोवळ्या बालमनावर नकळत परकीय धर्माच्या आणि विचारांचे प्रभुत्व लादले जात आहे, आकर्षण निर्माण केले जात आहे — आणि हे सगळे "Fun Activity" च्या नावाखाली घडत आहे. ही बाब दुर्लक्षित करण्यासारखी नाही; याला ठाम विरोध झालाच पाहिजे. कारण हा प्रश्न केवळ सण-समारंभाचा नसून, भावी पिढीच्या विचारविश्वाचा आहे.

आज शाळांमध्ये जे काही चालले आहे, ते पाहता एक गोष्ट स्पष्ट होते — शिक्षण आणि संस्कार यामधील सीमारेषा मुद्दाम पुसली जात आहे. देशातील अनेक इंग्रजी व सेमी-इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये सांता क्लॉजचे भव्य सादरीकरण केले जाते. वर्ग सजावट, लाल पोशाख, गाणी, कथा, भेटवस्तू, फोटोसेशन — सगळे काही इतके नियोजनबद्ध आणि आकर्षक असते की मुलांच्या मनात सांता क्लॉज आनंद, प्रेम आणि आदर्शत्वाचे प्रतीक बनतो.ही गोष्ट सहज घडत नाही.

बालमानसशास्त्राचा एक साधा पण प्रभावी सिद्धांत इथे काम करत असतो लहान वयात जी गोष्ट वारंवार आनंदासोबत दिली जाते, ती नकळत भावनिक नातं तयार करते. आज जी गोष्ट "फक्त Activity" वाटते, ती उद्या भावनिक जोड बनते आणि पुढे जाऊन वैचारिक ओढ निर्माण करते. हे समजून न घेणे म्हणजे डोळे असूनही आंधळेपण स्वीकारणे होय.इथे कोणत्याही धर्माचा अपमान करण्याचा प्रश्न नाही.पण एकतर्फी सादरीकरण, असंतुलित प्रभाव आणि नकळत घडवले जाणारे धार्मिक आकर्षण यावर प्रश्न उपस्थित करणे अत्यावश्यक आहे.

भारत ही केवळ विविध धर्मांची भूमी नाही, तर ती विचारांची परंपरा आहे.संत ज्ञानेश्वर महाराजांनी "विश्वाची माझे घर" असा व्यापक मानवतावादी विचार दिला.संत तुकाराम, नामदेव, एकनाथ, चोखामेळा यांनी समता, विवेक आणि माणुसकी शिकवली. छत्रपती शिवाजी महाराज आणि महाराणा प्रताप यांनी स्वाभिमान दिला. महात्मा फुले–सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेचा मजबूत पाया घातला.भगवान बुद्ध, भगवान महावीर, गुरुगोविंद सिंग यांनी मानवतेचा मार्ग दाखवला.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी आधुनिक भारताचे स्वप्न दिले. हा वैचारिक वारसा आपल्या मुलांचा हक्क आहे — पर्याय नाही.मग प्रश्न असा उभा राहतो — आपल्या संतांवर, महामानवांवर, समाजसुधारकांवर आधारित आनंददायी आणि सर्जनशील उपक्रम शाळांमध्ये का दिसत नाहीत?परकीय धार्मिक प्रतीकच "Fun" आणि "Celebration" का ठरवले जातात?पालक म्हणून गप्प बसणे म्हणजे हे सगळे "नॉर्मल" मान्य करणे होय. आणि जेव्हा चुकीची गोष्ट नॉर्मल होते, तेव्हा ती सवय बनते — आणि सवय भविष्यात गंभीर परिणाम घडवते.

आज प्रश्न विचारणे म्हणजे विरोध नाही.ते जाब विचारण्याचे धाडस आहे. ते जबाबदार पालकत्वाचे लक्षण आहे. पालकांना पूर्ण अधिकार आहेत — शाळेकडे थेट प्रश्न विचारण्याचा,

सांता क्लॉज सादरीकरण ऐच्छिक ठेवण्याची मागणी करण्याचा,"Fun Activity" च्या नावाखाली मुलांच्या मनावर काय रुजवले जाते आहे, हे समजून घेण्याचा.परकीय ज्ञान स्वीकारा — हरकत नाही.पण परकीय धार्मिक आकर्षण बालमनावर लादू नका.आज जर आपण सजग राहिलो नाही, तर उद्या आपल्या मुलांचे विचार कोण घडवेल, हा प्रश्नही आपल्या हातात राहणार नाही.म्हणूनच — सजग रहा.गप्प बसू नका.कारण आजचे मौन उद्याच्या वैचारिक गुलामगिरीचे बीज ठरू शकते.

## इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे 'ऑरेंज द वर्ल्ड' मोहिमेअंतर्गत जनजागृती उपक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या पुरस्कृत 'ऑरेंज द वर्ल्ड' या आंतरराष्ट्रीय मोहिमेअंतर्गत इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने नवीन पनवेल येथील सी. के. टी. विद्यालयात इयत्ता ९वी व ११वीच्या विद्यार्थिनींसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालय प्रशासनातर्फे इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा ॲड. सुनिता जोशी यांनी 'ऑरेंज द वर्ल्ड' मोहिमेचे महत्त्व, महिलांचे हक्क, सुरक्षितता तसेच महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची भूमिका याविषयी विद्यार्थिनींना सविस्तर व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. या उपक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थिनींसाठी पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी माध्यम, इंग्रजी माध्यम आणि ज्युनिअर कॉलेज अशा तीन विभागांतून प्रत्येकी तीन विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. उत्कृष्ट पोस्टर सादर करणाऱ्या विद्यार्थिनींना इनरव्हील क्लब ऑफ पनवेलतर्फे बक्षिसे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी "स्त्रियांवरील हिंसाचार थांबवा" या संदेशासाठी विद्यार्थिनी, शिक्षिका तसेच इनरव्हील क्लबच्या सदस्यांनी ऑरेंज रंगाच्या फिती परिधान करून, हातात जनजागृतीपर पोस्टर्स घेत विद्यालयाबाहेरील परिसरात जनजागृती फेरी काढली. या फेरीद्वारे महिलांवरील हिंसाचाराविरोधात समाजात सकारात्मक संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालिका वर्षा ठाकूर, इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्षा शुभांगी पिंपळकर, सेक्रेटरी डॉ. अमृता नाईक तसेच इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सर्व मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविण्याची गरज व्यक्त केली.

महिलांवरील हिंसाचाराविरोधात समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे आणि तरुण पिढीमध्ये समानता, सन्मान व सुरक्षिततेचे मूल्य रुजवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## योगेश्वरी शुगर्स येथे सर्व रोग निदान आरोग्य शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**अशोक नवघरे/पाथरी :-** तालुक्यातील योगेश्वरी शुगर्स लक्ष्मी नगर लिंबा येथे दि १५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता योगेश्वरी साखर कारखाना साईटवर ऊस तोड कामगार ठेकेदार तसेच सर्व कर्मचारी यांनचे आरोग्य शिबीर मध्ये सर्व रोग आरोग्य तपासणी करण्यात आली



योगेश्वरी शुगर्स व पाथरी तालुका ग्रामीण रुग्णालया यांच्या संयुक्त विद्यमाने हे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले यावेळी डॉ शबनम सय्यद ( वैद्यकीय अधिकारी बाभळगाव) डॉ बाबा चव्हाण ( समुदाय आरोग्य अधिकारी लिंबा) डॉ ज्ञानेश्वर नवले ( वैद्यकीय अधिकारी) डॉ कृष्णा राठोड डॉ अशोक क्षीरसागर ( आरोग्य सेवक) योगेश्वरी शुगर्सचे जनरल मॅनेजर चांदगुडे डि जी एम राजकुमार तौर. शेतकी अधिकारी तुकाराम झाडे चिप अंकाउन्टट रोडगे कॅशियर सुरेश गिराम मानशी मेडिकल मंकाजी शिंदे यांच्यासह योगेश्वरी साखर कारखान्यातील सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते

या सर्व रोग निदान शिबिर मध्ये अनेकांनी आपले रोग तपासणी मध्ये सहभाग घेतला

## श्री छत्रपती महाविद्यालय भवानी नगरच्या विध्यार्थ्यांचे कुस्ती स्पर्धेत यश

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील श्री. छत्रपती शिक्षण संस्था संचलित श्री. छत्रपती कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,भवानीनगर या महाविद्यालयातील विद्यार्थी महाराष्ट्र केसरी पै.वेताळ शेळके याने सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ अंतर्गत गुजरात येथे झालेल्या ऑल इंडिया सिनियर नॅशनल कुस्ती स्पर्धेमध्ये ९७ किलो वजन गटात ब्रांस पदक मिळवले तसेच पुणे येथे



झालेल्या मुळशी केसरी स्पर्धेमध्ये पै.मनीष रायते हा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला व जयपूर येथे झालेल्या खेलो इंडिया विद्यापीठ कुस्ती स्पर्धेमध्ये पै.अजय निंबाळकर याने ग्रीको रोमन स्पर्धेमध्ये ५५ किलो वजन गटामध्ये रोप्य पदक प्राप्त केले.

या विध्यार्थ्यांचे व प्रशिक्षक प्रा तुषार दूरगुडे, प्रा.प्रतिक काळभोर यांचे श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक सचिव दत्तारामं रामदासी महाविद्यालयाच्या प्राचार्या शिवाली माने देशमुख कार्यालयीन अधीक्षक सुशील निंबाळकर यांनी अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## विकलांगांसाठी नवी आशा जळगावात मोफत कृत्रिम हात वाटप

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** इनाली फाउंडेशन व या विकलांगांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून गरजू व्यक्तींना बॅटरीवर चालणारा मोफत इलेक्ट्रॉनिक प्रोस्थेटिक (कृत्रिम) हात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.रोटरी जळगाव ईस्ट तर्फे आयोजित हे विशेष शिबिर बुधवार,दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत होणार आहे.हे शिबिर रोटरी हॉल,गणपती नगर,जळगाव येथे आयोजित करण्यात आले असून,या कृत्रिम हातासाठी शस्त्रक्रियेची कोणतीही आवश्यकता नाही. हा हात बसवणे व काढणे सोपे असून,दैनंदिन सर्व कामांसाठी उपयोगी आहे.दिसायला आकर्षक,वजनाने हलका आणि मजबूत असल्यामुळे विकलांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी तो उपयुक्त ठरणार आहे.या उपक्रमासाठी डॉ.संजय शहा व डॉ.मनोज चौधरी यांचे विशेष मार्गदर्शन लाभत असून, प्रकल्प प्रमुख म्हणून डॉ.मनोज चौधरी व डॉ.संजय शहा कार्य पाहत आहेत. मेडिकल कमिटी चेअरमन म्हणून डॉ.जगमोहन छाबडा,अध्यक्ष कल्पेश छेडा,तर सचिव म्हणून पूजा अग्रवाल कार्यरत आहेत.ज्यांना किंवा त्यांच्या परिचयातील कोणाला कृत्रिम हाताची आवश्यकता आहे त्यांनी नाव,आधार कार्ड तपशील,मोबाईल नंबर व हाताचा फोटो संबंधित संपर्क क्रमांकावर पाठवावा,असे आवाहन करण्यात आले आहे.या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा,असे आवाहन सोयगाव येथील आरोग्यदूत दिगंबर वाघ, पाटील यांनी केले आहे.

## दिग्रस तालुक्यातील सर्व अंगणवाड्या , सर्व शाळांमधील २८ हजार विद्यार्थ्यांची होणार मोफत आरोग्य तपासणी

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर /दिग्रस प्रतिनिधी :** दिग्रस येथील ग्रामीण रुग्णालयाच्यावतीने संपूर्ण तालुक्यातील सर्व शाळा तसेच अंगणवाडयांमध्ये "राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम" राबविण्यात येत आहे . या अंतर्गत तब्बल २८ हजार बालकांच्या आरोग्य तपासणीचे उद्दिष्ट असून गरजूंचे शासनातर्फे उपचार व शस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात येणार आहे .

याबाबत सविस्तर असे की "राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत" संपूर्ण देशात ० ते १८ वर्षेपर्यंतच्या बालकांची आरोग्य तपासणी सुरू आहे . सदर अभिनव अभियानांतर्गत बालकांच्या डोळ्यांचा तिरळेपणा व इतर विकार-आजार , चष्मा , कान-नाक-घसा , हृदयरोग , अपंगत्व , त्यावरील उपचार , वैद्यकीय उपकरण-साहित्य वाटप तसेच महागडी शस्त्रक्रिया देखील पूर्णतः मोफत करण्यात येणार आहे .



दिग्रसचे वैद्यकीय अधीक्षक डॉ विरेंद्र अस्वार यांच्या मार्गदर्शनावाखाली तालुक्यात सदर उपक्रमांतर्गत दोन तपासणी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे . आरोग्य अधिकारी डॉ फैजान खान व सरिता जाधव तसेच औषध निर्माण अधिकारी रवी राऊत , परिचारिका प्रज्ञा भगत आदींच्या पथकाने येथील अंजुमन उर्दू विद्यालयातील विद्यार्थ्यांची नुकतेच आरोग्य तपासणी केली . यावेळी मुख्याध्यापक सोहेल जावेद , मजहर अहेमद खान , नासिर नौरंगाबादे , तारिक खान आदींनी त्यांचे स्वागत केले .

दिग्रस येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ नयन शेरे व डॉ प्रतीक्षा कनाके , औषध निर्माण अधिकारी प्रगती राठोड , परिचारिका शिल्पा जाधव यांचा दुसरा पथक देखील बालकांच्या आरोग्य तपासणीत व्यस्त आहे . अद्यापपर्यंत शहर व तालुक्यातील सर्व आस्थापनाच्या व सर्व माध्यमांच्या शाळा व अंगणवाडीमधील ६-७ हजार बालकांची आरोग्य तपासणी पूर्ण झाल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ विरेंद्र अस्वार यांनी दिली . उर्वरित लक्ष देखील लवकरच पूर्ण करण्यात येईल , असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला .

## सिल्लोडजवळ भरधाव ट्रकने चिरडले; सारोळा येथील तरुणाचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड:** छत्रपती संभाजीनगर-जळगाव महामार्गावर रविवारी दुपारी एका भरधाव आयशर ट्रकने दुचाकीस्वाराला पाठीमागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात सारोळा येथील २७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. अक्षय मोठेबा वराडे असे या दुर्दैवी मृताचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



सविस्तर माहितीनुसार, ही घटना रविवारी (दि.२४) दुपारी २:४५ वाजेच्या सुमारास स्वस्तिक लॉन्सजवळ घडली. अक्षय वराडे हा आपल्या मोटारसायकलवरून (क्रमांक एमएच २० ईव्ही ६०४२) सिल्लोडकडून आपल्या गावी, अर्थात सारोळा येथे निघाला होता. तो स्वस्तिक लॉन्सजवळ पोहोचला असता, पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या आयशर ट्रकच्या (क्रमांक एमएच २० इजी ५५८४) चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. या अनियंत्रित ट्रकने अक्षयच्या दुचाकीला मागून जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अक्षयचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर ट्रक चालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच सिल्लोड ग्रामीण पोलिसांनी तातडीने धाव घेत अक्षयला सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. या घटनेमुळे सारोळा गावात शोककळा पसरली असून, रात्री उशिरा शोकाकुल वातावरणात अक्षयच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन काळे करत असून, फरार ट्रक चालकाचा शोध पोलीस घेत आहेत

## अमृत नगर ओएनजीसी कॉलनी,बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर अखेर गतिरोधक बसविण्यात आले

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** अमृत नगर ओएनजीसी कॉलनी,बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर वाहनांचा वेग कमी करण्यासाठी वारंवार स्थानिक स्कूल बस वाहन चालक तसेच नागरिकांकडून याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी होत होती.मुख्य म्हणजे याठिकाणी शाळा,बँक,मार्केट जवळ असून,तसेच आणि हा प्रचंड रहदारीचा रस्ता असल्यामुळे याठिकाणी भविष्यातील अपघात टाळण्यासाठी येथे



गतिरोधक बसविणे गरजेचे होते.याशिवाय सकाळच्या वेळी स्कूल बस देखील मोठ्या प्रमाणावर या रस्त्यावरून येत-जात असतात.त्यामुळे शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षेचा विचार करता भविष्यात याठिकाणी कोणताही अपघात होऊ नये यासाठी याची गांभीर्यता ओळखून तातडीने प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा अध्यक्ष प्रशांत मुके आणि पत्रकार केतन भोज यांच्या पुढाकाराने व सततच्या केलेल्या पाठपुराव्यामुळे मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त गजानन बेल्लाळे,रस्ते अभियंता संतोष झिंजोर्डे यांच्या माध्यमातून याठिकाणी गतिरोधक बसविण्यात आले. यावेळी कंत्राटदार प्रदिप भोसले यांनी हे गतिरोधक बसविण्याचे काम व्यवस्थितपणे करून दिले.अमृत नगर ओएनजीसी कॉलनी,बँक ऑफ इंडिया समोरील मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्यात आल्यामुळे यावेळी स्कूल बस वाहन चालकांनी समाधान व्यक्त केले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## सीआरसी आधारवाडी केंद्र क्रमांक ९ यांच्यावतीने केंद्रातील सर्व शाळांची शिक्षण परिषद संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर/रशीद शेख :** सीआरसी ९ आधारवाडी अंतर्गत सीआरसीतील सर्व शाळांची शिक्षण परिषद नुकतच शारदा मंदिर प्राथमिक शाळा कल्याण येथे पार पडली. सदर शिक्षण परिषदेस शिक्षण अधिकारी कल्याण डोंबिवली महानगरपालिका विजय सरकटे , सी आर सी प्रमुख डॉक्टर अनिता तायडे आणि सी आर सी मधील सर्व मान्यवर आणि मुख्याध्यापक उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून फाउंडेशनच्या फाउंडर फर्नांडिस मॅडम(मानसशास्त्र तज्ज्ञ) आणि मराठी सिने अभिनेत्री माधवी छाईलकर ( घरोघरी मातीच्या चुली मालिकेतील कलाकार ) उपस्थित होत्या. यावेळी



माधवी मॅडम यांनी आजच्या कौटुंबिक पद्धतीमध्ये आजीचे असणं कसे महत्वाचे आहे हे त्यांच्या आजी या मराठी चित्रपटाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवले ,तसेच फर्नांडिस मॅडम यांनी दिव्यांग मुलं, आणि सामान्य विद्यार्थी यांच्याशी संवाद कसा करावा हे प्रात्यक्षिकातुन स्पष्ट केले. अपर्णा हर्षे शारदा मंदिर प्राथमिक विभाग आणि त्यांची संपूर्ण टीम यांनी अतिशय उत्तमरितीने आजच्या सकारात्मक शिस्त कार्यक्रमाचे नियोजन केले होते.उत्साही आंनदी वातावरणात ही शिक्षण परिषद संपन्न झाली.

## सिकंद्राबाद डिव्हिजनल बैठकीत उमरी रेल्वे स्थानकातील प्रलंबित मागण्याचे सकारात्मक चर्चा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर/रुपेशकुमार ग.श्रीरामवार :** सिकंद्राबाद येथे रेल्वे डीआरयुसीसी मेबर सदस्य समीतीची बैठक संपन्न झाली.

सदरील बैठकीत हैदराबाद डिव्हिजनचे डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर संतोष कुमार वर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत रेल्वे डी यु आर सी सी मेंबर पारसमल दर्डा यांनी उमरी रेल्वे स्थानकातील प्रलंबित मागण्या विषयी डी आर एम संतोष कुमार वर्मा यांना निवेदन देऊन सकारात्मक चर्चा करण्यात आली.

या बैठकीत गाडी संख्या 17231 नरसापुर नगरसोल, गाडी संख्या 17232 नगरसोल नरसापुर, गाडी संख्या 12787 नरसापुर नगरसोल,



गाडी संख्या 12788 नगरसोल नरसापुर तसेच निजामाबाद पंढरपुर गाडी संख्या 11413, पंढरपूर निजामबाद गाडी संख्या 11414 सदरील गाडीला स्लीपर कोच लावण्यात यावे. तसेच निजामाबाद पुणे गाडी संख्या नंबर 11410 पुणे निजामबाद गाडी संख्या 11409 सदरील गाडीला स्लीपर कोच जोडण्यात यावे. रॉयलसीमा एक्सप्रेस गाडी संख्या नंबर 12793 तिरुपतीहुन निजामाबाद पर्यंत चालणारी गाडी ही नांदेड पर्यंत सोडण्यात यावी. भगतकी कोठी काचीगुडा ते भगतकी कोठी गाडी संख्या नंबर17605, भगत की कोठी ते काचीगुडा गाडी संख्या नंबर 17606 या गाडीचा उमरी रेल्वे स्थानक येथे थांबा देण्यात यावा.

उमरी रेल्वे स्थानकात रेल्वे स्टेशन मधून बाहेर जाण्यासाठी फुट ब्रीज मंजूर करण्यात यावा .रेल्वे स्थानकात पर्मनंट आरपीएफ देण्यात यावे. रेल्वे स्थानकात सी सी टी व्ही कॅमेरे बसविण्यात यावे तसेच अजमेर जयपुरला जाण्यासाठी जयपूर एक्सप्रेस गाडीला उमरी स्थानकात थांबा देण्यात यावा रेल्वे स्थानकात तात्काळ शौचालय बाधुन देण्यात यावे.अशा विविध मागण्याचे निवेदन देऊन या मागण्या संदर्भात बैठकीत चर्चा करण्यात आली.वरील मागण्या विषयी सकारात्मक विचार प्रयत्न करणार असल्याचे अश्ववाशन संबंधित रेल्वे अधिकाऱ्यानी. हैद्राबाद डिव्हिजन चे रेल्वे डी आर यु सी सी मेबर पारसमल दर्डा यांना दिले या वेळी उपस्थित काही क्षण.

## पदोन्नततील आरक्षण व वर्गीकरण बाबत कामगार नेते भारत वानखेडे यांनी सामाजिक न्याय मंत्री यांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर / प्रतिनिधी :** राज्य विधान मंडळाच्या नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशन कालावधीमध्ये अनुसूचित जाती / जमाती/ वि.जा भज/ वि.मा.प्र. शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटना, मंत्रालय मुंबई या संघटनेचे राज्य अध्यक्ष भारत वानखेडे यांनी राज्याचे सामाजिक न्याय खात्याचे मंत्री महोदय माननीय संजय शिरसाट साहेब यांची दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी भेट घेतली.याप्रसंगी त्यांच्या समवेत सामाजिक न्याय विभागाचे माजी मंत्री तथा विद्यमान आमदार माननीय श्री राजकुमार बडोले साहेब तथा संघटनेचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिष्टमंडळांने मागासवर्गीय समाजाच्या खालील प्रश्नाबाबत सामाजिक न्याय खात्याच्या मंत्रिमहोदयांना निवेदन देऊन कार्यवाही बाबत विनंती केली



आहे.

(1) मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी यांच्या पदोन्नती मधील आरक्षण प्रक्रिया पूर्ववत सुरू करणे- राज्यात सध्या सन 2017 पासून मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी यांना पदोन्नती देण्याची आरक्षण प्रक्रिया बंद असल्याने हे अधिकारी कर्मचारी सेवा जेष्ठतेनुसार पात्र असून सुद्धा पदोन्नती पासून वंचित आहेत. मागासवर्गीयांचा आरक्षणाचा प्रश्न हा अत्यंत संवेदनशील असून याबाबत तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे.त्याचप्रमाणे भारत सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने दिनांक 12 एप्रिल 2022 रोजी आदेश काढून मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत स्पष्टपणे निर्देश दिले आहेत.तरी न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी यांना पदोन्नती देण्याची आरक्षण प्रक्रिया पूर्ववत सुरू करण्यात यावी.

(2) अनुसूचित जातीची वर्गवारी करणारा निर्णय रद्द करणे - अनु.जातीची अ ब क ड अशी वर्गवारी करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने समितीचे गठन केले आहे. याबाबत याबाबत असे नमूद करण्यात येते की अनुसूचित जातीमध्ये 58 जातींचा समावेश असून यापैकी फक्त एका जातीने वर्गवारी करण्याची मागणी आहे. इतर कोणत्याही जातीची वर्गवारी करण्याची मागणी नाही. तसेच अनुसूचित जातीमध्ये अ ब क ड असे विभाजन केल्यामुळे वर्षानुवर्षे गुण्यागोविंदाने राहत असलेल्या अनुसूचित जाती मधील जाती -जाती मध्ये भेदभाव निर्माण केल्यासारखे होईल, आणि हे संविधानाच्या समानतेच्या तत्त्वाविरुद्ध होईल. त्यामुळे संपूर्ण अनुसूचित जातीवर अन्याय करणारा अ ब क ड अशी वर्गवारी करण्याबाबतचा शासनाने घेतलेला निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अशी या समाजाची मागणी आहे.सामाजिक न्याय विभागाच्या मंत्री महोदयांनी संघटनेच्या वरील मागण्यांबाबत तातडीने शासन स्तरावर बैठकीचे आयोजन करण्यात येवून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले. याप्रसंगी संघटनेचे राज्य अध्यक्ष भारत वानखडे, राज्य कार्याध्यक्ष अंबादास चंदनशिवे यांच्या समवेत संघटनेचे मुंबई प्रदेशाध्यक्ष सुबोध भारत, कोषाध्यक्ष सी. आर.निखारे व श्रीमती दिपाली शहारे ,नीलिमा कांबळे श्री मोगल तसेच अन्य पदाधिकारी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

## सोयगावात होमगार्ड वर्धापन दिन साजरा; रुग्णालयात फळ वाटप,वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/विजय काळे :** शहरात होमगार्ड दलाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली.तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले.याचबरोबर सोयगाव येथील होमगार्ड समादेशक कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवून साफसफाई करण्यात आली.होमगार्ड जवानांनी सेवा,शिस्त आणि समर्पणाची भावना जपत समाजोपयोगी उपक्रम राबवले.या कार्यक्रमावेळी सोयगाव समादेशक कडुबां बावस्कर, लिपिक कृष्णा शेवाळकर तसेच कर्मचारी व होमगार्ड कर्मचारी समाधान(भावडु) काळे,ऋषिकेश काळे,किरण सपकाळ,विजय रावणे,संतोष घनगाव,दिनेश काळे,सतीश मंडवे,गजानन बागुल,ज्ञानेश्वर काळे,राजू पिंजारी,विनोद इंगळे,शांताराम मिसाळ,विलास भवर,बबलू लवटे,शकिल शेख, रोकडे,आदी




उपस्थित होते.....

**प्रतिक्रिया..**

"होमगार्ड दल हे समाजसेवेचे व आपत्ती व्यवस्थापनातील महत्त्वाचे अंग आहे.वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या समाजोपयोगी उपक्रमांतून सेवा,शिस्त व समर्पणाची भावना अधिक बळकट होते."

**सोयगाव पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक पंकज बारंवाल...**

### आ. विक्रांत पाटील यांच्या लढाऊ पाठपुराव्याला यश

## सिडकोच्या LIG व EWS घरांच्या किमती झाल्या 10% नी कमी, महायुती सरकारची सभागृहात घोषणा !

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे मिळावीत यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार विक्रांत पाटील यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. सिडकोकडून उभारण्यात येणाऱ्या घरांच्या किमतींमध्ये १० टक्के दरकपात करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महायुती सरकारने घेतला आहे.अनेक गोर-गरीब लॉटरी धारक नागरिकांच्या आशा या निर्णयाकडे लागून राहिल्या होत्या. हजारो नागरिकांनी आपल्या भावना आमदार विक्रांत पाटील यांच्याकडे वारंवार व्यक्त केल्या होत्या. आजच्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे लाखो नागरिकांना दिलासा मिळालेला आहे. हाऊसिंग फॉर ऑल' या केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी धोरणाला अधिक बळ देण्यासाठी EWS (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) आणि LIG (कमी उत्पन्न गट) या दोन्ही प्रवर्गांतील घरांच्या दरांमध्ये ही कपात लागू करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यास मोठी मदत होणार आहे.सिडकोच्या घरांच्या वाढलेल्या किमतींबाबत आमदार विक्रांत पाटील यांनी हिवाळी अधिवेशनात ठाम भूमिका घेत शासनाचे लक्ष वेधले होते. अवास्तव दरांमुळे सामान्य नागरिक घरापासून दूर जात असल्याचा मुद्दा त्यांनी ठळकपणे मांडत, दरकपात करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती. त्यांच्या याच पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला. या निर्णयामुळे नवी मुंबई, पनवेल व परिसरातील हजारो लाभार्थ्यांना दिलासा मिळणार असून, सिडकोच्या घरांसाठीची मागणीही वाढण्याची शक्यता आहे. आमदार विक्रांत पाटील यांनी या निर्णयाबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानत, सर्वसामान्य माणसाच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी हा निर्णय मैलाचा दगड ठरेल अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. दरकपातीच्या या निर्णयामुळे 'हाऊसिंग फॉर ऑल' हे धोरण प्रत्यक्षात उतरवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले असल्याचे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. आमदार विक्रांत पाटील यांनी लढलेल्या लढ्याबद्दल लॉटरी धारकांनी त्यांचे अभिनंदन केले व आभार मानले आहेत.

## कुडे बौद्धवाडी अंतर्गत रस्त्याची दुरावस्था; शासनाने लक्ष देण्याची नागरीकांची मागणी..

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे :** तळा तालुक्यातील कुडे बौद्धवाडी अंतर्गत रस्त्याची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. मांदाड ते कुडे या मुख्य रस्त्याला कुडे बौद्धवाडी अंतर्गत जोडरस्ता आहे. या अंतर्गत रस्त्याची लांबी सुमारे 700 ते 800 मीटर आहे. गेल्या नऊ-दहा वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. परंतु ठेकेदाराच्या निकृष्ट कामाच्या दर्जामुळे या रस्त्यावरील डांबर निघून रस्त्यावर खडीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरीक, वयोवृद्ध नागरिक, कुडे बौद्ध वाडीतून



मुख्य रस्त्यावर असलेल्या कुडे बस स्थानकापर्यंत तसेच विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जात येत असताना पाय घसरणे, मुरगळणे, टु-व्हिलर सरकणे, यांसारख्या घटना वारंवार घडत आहे. रात्री अपरात्री नागरिकांना मुख्य गावातून कुडे बौध्ववाडीकडे किंवा बौद्ध वाडीतून मुख्य गावांमध्ये कामानिम्मित जाताना जीव मुठीत धरून ये- जा करावी लागते.. अंतर्गत रस्त्यावर रात्री अंधार असल्यामुळे या रस्त्यावरून ये जा करत असताना नागरिकांना सर्पदंश विंचू चावल्याच्या घटना घडलेल्या आहेत . इलेक्ट्रीक स्ट्रीट लाईट नसल्यामुळे पावसाळ्यामध्ये अंतर्गत रस्ता अतिधोकादायक बनतोअनुसूचित जाती उपजाती बौद्ध वस्त्यांमध्ये मूलभूत सोयीसुविधा पुरवून तेथील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी बौद्ध वस्ती सुधार योजनेची अंमलबजावणी शासनाकडून करण्यात येते. या योजनेअंतर्गत वस्त्यांमध्ये अंतर्गत रस्ते, समाज मंदिरे, नाले गटारे, पाण्याची सोय, रस्त्यावरील विद्युत पुरवठा, शौचालये, इत्यादी नागरी सुविधांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात येते. असे शासनाचे धोरण असताना शासनालाच या धोरणांचा विसर पडला की काय असा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

## मंगळवारी सेलूत राजेशभाई महाराजांचे आगमन; दोन दिवस भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी** : पाथरी तालुक्यातील प्रसिद्ध गुंज संस्थानचे वंशपरंपरागत विश्वस्त श्री राजेशभाई महाराज देसाई यांचे मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता सेलू शहरात आगमन होत आहे. त्यांच्या आगमनानिमित्त शहरातील ग्रामदैवत श्री केशवराज बाबासाहेब महाराज मंदिर परिसरात दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.मंगळवार, १६ डिसेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता श्री दत्त पंचपदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच बुधवार, १७ डिसेंबर रोजी सकाळी साडेपाच वाजता काकडा आरती, सकाळी आठ वाजता पाद्यपूजा व अनुग्रह, सकाळी दहा वाजता श्रींच्या पादुकांचा अभिषेक, दुपारी एक वाजता आरती व महाप्रसाद होणार आहे.याच दिवशी दुपारी चार ते पाच या वेळेत "दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा" या दिव्य मंत्राचा घंटानाद करण्यात येणार असून सायंकाळी सहा वाजता शांतीपाठ व श्री दत्त पंचपदी कार्यक्रमाने




कार्यक्रमांची सांगता होणार आहे.या दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचा लाभ शहर व परिसरातील जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा, असे आवाहन दत्तभक्त परिवार, सेलू यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## किशोर थोरात यांची सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघाच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**पुणे प्रतिनिधी :** सामाजिक क्षेत्रात सातत्यपूर्ण, निःस्वार्थ व परिणामकारक कार्य करणारे किशोर अण्णासाहेब थोरात यांची सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघ या राष्ट्रीय स्तरावरील संस्थेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. राजेश कुंभारे यांनी त्यांच्या व्यापक सामाजिक योगदानाची दखल घेत ही निवड जाहीर केली.विशेष म्हणजे त्यांची ही निवड त्यांना वाढदिवसाची भेट म्हणून १३ दिसेम्बर रोजी देण्यात आली.

किशोर थोरात हे गेल्या तीन वर्षांपासून संघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. या कालावधीत त्यांनी मानवी हक्क संरक्षण, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देणे, महिला सुरक्षितता, बालहक्क संरक्षण,



शैक्षणिक मदत, आरोग्यविषयक जनजागृती, गरीब व गरजू कुटुंबांसाठी आर्थिक व कायदेशीर सहाय्य, तसेच सामाजिक अन्यायाविरोधात आवाज उठवण्याचे कार्य प्रभावीपणे केले. आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत, रक्तदान शिबिरे, मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, तसेच सामाजिक कुप्रथा व व्यसनमुक्तीविरोधात जनजागृती कार्यक्रम राबवण्यात त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल तीसपेक्षा अधिक पुरस्कार विविध सामाजिक व शैक्षणिक संस्थांकडून प्रदान करण्यात आले आहेत. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा दृष्टिकोन आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढा देण्याची भूमिका यामुळे ते एक संवेदनशील व लोकाभिमुख नेतृत्व म्हणून ओळखले जातात.

या निवडीबद्दल संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री. तेजस परमार तसेच पश्चिम भारत अध्यक्ष श्री. अमोल बाळासाहेब माने यांनी किशोर थोरात यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना किशोर थोरात यांनी राष्ट्रीय अध्यक्ष, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले असून, महाराष्ट्रभर संघटनेचे कार्य अधिक व्यापक, संघटित व परिणामकारक करून समाजातील वंचित, पीडित व गरजू घटकांच्या न्यायासाठी अधिक ताकदीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री चा हात असतो त्याचप्रमाणे त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या पत्नी सविता थोरात यांचाही मोठा सहभाग आहे असे किशोर थोरात यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीमुळे महाराष्ट्रात सामाजिक कल्याण एवं मानव संरक्षण संघाच्या कार्याला नवी दिशा, ऊर्जा व बळ मिळेल, अशी अपेक्षा सामाजिक क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

# सत्ताधा-यांकडून नगरपालिका निवडणुकीत ड्रग्सच्या पैशाचा महापूर, 'उडता महाराष्ट्र' बनवण्याचे षडयंत्र: हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचं वाटोळं होत असल्याची नवनवी उदाहरणं सातत्याने समोर येत आहेत. शासकीय जमिनींच्या विक्रीच घोटाळे, टेंडरमधील कमिशन, समृद्धी शक्तीपीठ महामार्गातील भ्रष्टाचारातून कमावलेलं पैसा कमी पडू लागल्याने सत्ताधारी आपल्या जवळच्या लोकांमार्फत अंमली पदार्थांचे कारखाने काढून राज्यातील युवा पिढीला व्यसनी बनवत आहेत. नगरपालिका निवडणुकीत या ड्रग्सच्या माध्यमातून कमावलेल्या पैशाचा महापूर आणून उडता महाराष्ट्र बनविण्याचा घृणास्पद प्रकार सुरु आहे, अशी घणाघाती टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

टिळक भवन येथे पत्रकार परिषदेला संबोधित करताना सपकाळ म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या साता-यातील दरे गावातील घरापासून हाकेच्या अंतरावर अंमली पदार्थांचे उत्पादन करणारा कारखाना सुरु होता.




या प्रकरणात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जवळच्या लोकांच्या या प्रकरणात सहभाग असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या काही आरोपीला सोडून दिले. काही बंगाली आणि बांग्लादेशी कामगारांना अटक करून मुख्य सुत्रधाराला सोडून देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. ड्रग्स निर्मिती करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या महायुती सरकारने सातारा ड्रग्स फॅक्टरी प्रकरणी पुढील प्रश्नांची उत्तरे द्यावीत...

१. पश्चिम बंगाल व बांग्लादेशचे कामगार इतक्या दुर्गम ठिकाणी कोणाच्या मदतीने वास्तव्यास थांबले?

२. ज्या ठिकाणी ड्रग्स निर्मिती सुरु होती त्या इमारतीच्या मालकाकडून ओंकार दिघे याने एकनाथ शिंदेच्या पक्षाचे नगरसेवक प्रकाश शिंदे यांच्या कामासाठी जागा वापरण्यास मागितली होती, हे स्पष्ट झाल्यावर ओंकार दिघे याला ड्रग्स निर्मिती स्थळावरच ताब्यात घेण्यात आले होते, परंतु त्याला कोणाच्या दबावामुळे सोडण्यात आले?

३. ओंकार दिघे हा सावळी गावात कधीपासून वास्तव्यास आहे?, कोणामुळे तो इकडे आला?

४. इतर जवळपास ४० कामगार या कामगारांसोबत काम करत होते त्यांच्याबाबत काय झालं ? त्यांना पळून जाण्यात कुणी मदत केली? पोलिसांनी कोणाच्या दबावाखाली त्यांना सोडून दिले.

५. ज्याला एक दिवस आधी २ किलो MD ड्रग्स सह अटक केली तो विशाल मोरे अजितदादा गटाचा पुण्यातील विद्यार्थी संघटनेचा प्रमुख आहे, त्याचे ओंकार दिघे आणि प्रकाश शिंदे यांच्याशी काय संबंध आहेत?

६. प्रकाश शिंदे कारवाईच्या आदल्या रात्रीपर्यंत तेजस हॉटेलवर होते, रात्री विशाल शिंदे याला अटक झाल्यावर ते हॉटेलवरून कसे निघून गेले? त्यांना तिथून पळून जाण्यास कोणी मदत दिली.

७. पोलिसांनी तेजस हॉटेलची झाडाझडती का घेतली नाही पंचनामा केला की नाही? महाराष्ट्राला ड्रग्स च्या विळख्यात लोटणाऱ्या या गंभीर घटनेवर गृहमंत्री अजून गप्प का आहेत?

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने तिथे जाऊन धाड घालेपर्यंत सातारा पोलिसांना यांची कल्पना नव्हती का? त्यांच्या आशिर्वादानेच हा कारखाना सुरु होता? की उपमुख्यमंत्र्यांच्या जवळचे लोक हा कारखाना चालवत असल्याने कारवाई होतं नव्हती? जिथे साधा रस्ता नाही अशा दुर्गम भागात हे हॉटेल आणि ड्रग्सचा कारखाना एकाचवेळी सुरु झाले. कारखान्यात काम करणा-यांचे जेवणही याच हॉटेलमधून जात होते. या हॉटेलचे मालक आणि अंमली पदार्थांचा कारखाना चालवणारे एकच आहेत अशी माहिती स्थानिकांकडून मिळत आहे. त्याच्यावर कारवाई करू नये म्हणून उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्यातील एका खासदाराने पोलिसांवर दबाव आणला हे खरे आहे का?

विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "ड्रग्स बनवणे सोपे आहे" असे बेजबाबदार वक्तव्य केले. यावरून तरुणाईचे भविष्य उद्ध्वस्त करणा-या या विषाचा व्यापार रोखण्याबाबत ते गंभीर नाहीत हे स्पष्ट झाले आहे. एकीकडे बांगलादेशी घुसखोरांविरोधात ओरडणारे सत्ताधारी नेते बांग्लदेशींना आणून ड्रग्सच्या फॅक्टरी चालवत आहेत. एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना खिशात घातल्याचे वक्तव्य राजकीय पटलावर चर्चेत आहे. शाह यांच्या दबावामुळे या प्रकरणातील आरोपींना अटक होतं नाही का? याचा खुलासाही सरकारने करावा असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले. निवडणूक आयोगाचा कारभार पारदर्शक व निष्पक्ष नाही. निवडणूक आयोगाने आज निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली असली तरी निवडणूक याद्या, दुबार मतदार आणि प्रभाग रचनेबाबत आम्ही महत्त्वाचे पुराव्यासह, आक्षेप आणि हरकती नोंदवल्या होत्या. त्यावर आयोगाने काहीच कारवाई केली नाही. सत्ताधारी पक्षाचा पुण्यातील एक कार्यकर्ता उघडपणे वॉर्ड रचना करत असल्याचे समोर येऊनही आयोग गप्प का आहे? हे समजण्यापलीकडचे आहे. राज्यात माहापालिकांच्या निवडणुका होत आहेत पण त्या पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुका होणार नाहीत, हे आता स्पष्ट दिसत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## पेण आर टी ओ २०२६, मोटर वाहन निरीक्षकांचा शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर. जाणून घ्या आपल्या तालुक्यात कधी

**पेण/दीपक लोके :** उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षकांचा जानेवारी 2026 ते जून 2026 या सहा महिन्यांचा शिबिर दौरा कार्यक्रम जाहीर झाला आहे. नागरिकांची सोय आणि वाहन संबंधित सेवांचे विकेंद्रीकरण साधण्यासाठी आरटीओकडून विविध ठिकाणी नियोजित दिवशी तांत्रिक तपासणी, परवाना प्रक्रिया आणि इतर सेवा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविला जाणार आहे. अधिकृत कार्यक्रमानुसार निरीक्षकांचे दौरे नियोजित तारखांना संबंधित ठिकाणी आयोजित करण्यात येणार असून दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.




माहे जानेवारी-2026: बुधवार, दि.14 जानेवारी 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.13 जानेवारी 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.09 जानेवारी व शुक्रवार, दि.23 जानेवारी 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.12 जानेवारी व मंगळवार दि.27 जानेवारी 2026 ता.महाड, बुधवार, दि.28 जानेवारी 2026 ता.श्रीवर्धन, गुरुवार, दि.29 जानेवारी 2026, ता.माणगाव.

माहे फेब्रुवारी-2026: बुधवार, दि.18 फेब्रुवारी 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.17 फेब्रुवारी 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.13 फेब्रुवारी व शुक्रवार, दि.27 फेब्रुवारी 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.16 फेब्रुवारी व सोमवार दि.23 फेब्रुवारी 2026 ता.महाड, मंगळवार, दि.24 फेब्रुवारी 2026 ता.श्रीवर्धन, बुधवार, दि.25 फेब्रुवारी 2026, ता.माणगाव.

माहे मार्च-2026 : बुधवार, दि.18 मार्च 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.17 मार्च 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.13 मार्च व सोमवार, दि.30 मार्च 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.16 मार्च व सोमवार दि.23 मार्च 2026 ता.महाड, मंगळवार, दि.24 मार्च 2026 ता.श्रीवर्धन, बुधवार, दि.25 मार्च 2026, ता.माणगाव.

माहे एप्रिल-2026 : बुधवार, दि.22 एप्रिल 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.21 एप्रिल 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.10 एप्रिल व शुक्रवार, दि.24 एप्रिल 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.20 एप्रिल व सोमवार दि.27 एप्रिल 2026 ता.महाड, मंगळवार, दि.28 एप्रिल 2026 ता.श्रीवर्धन, बुधवार, दि.29 एप्रिल 2026, ता.माणगाव.

माहे मे-2026 : बुधवार, दि.13 मे 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.12 मे 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.08 मे व शुक्रवार, दि.22 मे 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.11 मे व सोमवार दि.18 मे 2026 ता.महाड, मंगळवार, दि.19 मे 2026 ता.श्रीवर्धन, बुधवार, दि.20 मे 2026, ता.माणगाव.

माहे जून-2026 : बुधवार, दि.17 जून 2026, ता.रोहा, मंगळवार, दि.16 जून 2026, ता.मुरुड, शुक्रवार, दि.12 जून व शुक्रवार, दि.19 जून 2026 ता.अलिबाग, सोमवार, दि.15 जून व सोमवार दि.22 जून 2026 ता.महाड, मंगळवार, दि.23 जून 2026 ता.श्रीवर्धन, बुधवार, दि.24 जून 2026, ता.माणगाव.

## मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांत नैराश्य, डिजिटल लॉकडाऊनची गरज

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी/ अशोक नवघरे/पाथरी :** मागील काही वर्षांपासून विशेषतः कोरोना काळात दोन वर्षं शाळा बंदच राहिल्याने ७० टक्के मुलांना मोबाइलची सवय जडली शिक्षण तथा आँनलाईन अभ्यासासाठी मुलांच्या हाती मोबाईल आले पण आता ती मुलांची सवयच बनली आहे यामुळे मुलांना मणका डोळे कान मेंदूच्या गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत आहे मुख्यत्वे डोळयांतून पाणी गळणे डोळे चुळचुळ करणे डोळे दुखणे लांबचे कमी दिसने भुरकट दिसने चिडचिडेपणा आदी गोष्टी प्रकर्षाने जाणवत आहेत तर अनेक जण मोबाईल



शिवाय अभ्यास किंवा जेवण सुध्दा करत नाहीत अशी स्थिती निर्माण झाली आहे आता विद्यार्थ्यांना मोबाईल वर आँनलाईन न देता शालेय परिसरात शिक्षण घेण्याचा आनंद मिळावा अशी अपेक्षा पालकवर्ग व्यक्त करत आहे मोबाईलच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांत भवितव्यासाठी दुष्टीने अत्यंत मारक ठरत आहे तसेच अभ्यासातील एकाग्रता कमी होत आहे तर आता , डिजिटल लॉकडाऊनची गरज आहे , विद्यार्थ्यांसह पालकांनी आता डिजिटल लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्याची गरज आहे दररोज संध्याकाळी सात ते नऊ पर्यंत घरात मोबाईल व टीव्ही चा वापर पूर्णपणे बंद करावा व दर रविवारी मुलांना मोबाइल व टिव्ही न पाहू देता मैदानी खेळ खेळण्यावर भर द्यावा तर मुले आँनलाईन अभ्यासाच्या नावाखाली पालकांकडे मोबाईलची मागणी करतात आता शाळा ऑफलाइन सुरू असल्याने शिक्षकांनी देखील गरजेशिवाय आँनलाईन अभ्यास देणे टाळल्यास मुले लवकरच सर्व समस्यातून बाहेर येतील असे पालकवर्गातून बोलले जात आहे

## छत्रपती संभाजीनगर विभागातून कालिका देवी विद्यालय रस्सीखेच स्पर्धेत प्रथम

**दैनिक युवक आधार (शिरूर कासार) :** शिरूर (का.) 'महाराष्ट्र शासनाच्या' शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.यांच्या अधिनस्त 'छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा परिषद' आयोजित 'शालेय रस्सीखेच' स्पर्धेचं आयोजन करण्यात आले होते.ही शालेय रस्सीखेच स्पर्धा वयोगट १९ वर्षाखालील मुलींसाठी होती. या स्पर्धेमध्ये,कालिकादेवी विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार मुलींच्या व मुलांच्या अशा दोन्ही संघाने सहभाग नोंदविला होता.या शालेय रस्सीखेच



स्पर्धेत छ.संभाजीनगर विभागातील अनेक नामांकित शाळेने सहभाग घेतला होता.मात्र कालिकादेवी विद्यालयाच्या १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने 'प्रथम क्रमांक' पटकाविला आहे.तर १७ वर्ष वयोगटातील मुलांनी 'द्वितीय क्रमांक' तर १४ वर्षे वयोगटातील मुलींनी सुद्धा 'द्वितीय क्रमांक' मिळवून बाजी मारली आहे. विद्यालयामधील,क्रीडा शिक्षक श्री रविंद्र बडे व प्रा.बाळासाहेब खटाणे यांनी मुलींच्या व मुलांच्या रस्सीखेच स्पर्धेची तयारी अतिशय मेहनतीने व कौशल्यपूर्ण करून घेतली होती.यामुळे विद्यालयातील मुलींच्या व मुलांच्या संघाने दोन्ही गटात विभागीय स्तरावर शालेय रस्सीखेच स्पर्धेमध्ये 'प्रथम क्रमांक'आणि लहान गटात 'द्वितीय क्रमांक' मिळवून छत्रपती संभाजीनगर विभागात कालिकादेवी विद्यालयाने नाव लौकिक करून दाखविले. यामुळे बीड जिल्ह्यातील व तालुका शिरूर (का.) परिसरातील सर्व क्रीडाप्रेमी यांच्या वतीने विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.यामुळे कालिकादेवी विद्यालयातील मुलींच्या संघाला तसेच मुलांच्याही संघाला राज्यस्तरीय पातळीवर जाण्याचा मान मिळाला आहे.

प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे व सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थी यांनी विद्यालयाचे व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## अखेर दिवेकरांना मिळणार स्वतंत्र पोलीस स्टेशन ; ९५% काम पूर्ण; दिवा शिवसेनेच्या शिष्टमंडळाचा पाहणी दौरा

**दैनिक युवक आधार**

**ठाणे वार्ताहर :** अनेक वर्षांपासून मागणी असलेल्या वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरासह आजूबाजूच्या परिसरातील गावांसाठी वेगळे पोलीस स्टेशन असावे अशी मागणी वारंवार होत होती. दिवा शहर आणि परिसराची लोकसंख्या पाच लाखापेक्षा जास्त झाली असून दिवा परिसरासाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन नसल्याने मुंब्रा पोलीस स्टेशनला हा सर्व भाग जोडलेला आहे. मुंब्रा पोलीस स्टेशनवर आधीच भार असताना दिव्यातील पाच लाख पेक्षा अधिक लोकसंख्येच्या परिसराला केवळ २५ ते ३० पोलीस कर्मचारी मिळतात. त्यामुळे दिवा शहर परिसरासाठी लोकसंख्येनुसार स्वतंत्र पोलीस स्टेशनची निर्मिती करावी अशी वारंवार मागणी होत होती. दिवा शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच गेल्या काही वर्षात गुन्हेगारी वाढली आहे. खून, चोऱ्या, दरोडे, विनयभंग, फसवणूक असे अनेक प्रकार वारंवार घडत आहेत. परंतु स्वतंत्र स्टेशन नसल्याने व अपुरे पोलीस बळ उपलब्ध असल्यामुळे अशा गुन्ह्यांची उकल होण्यास अचडण येत आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्याला व शहरप्रमुख रमाकांत



मढवी यांच्या मागणीला यश आल्याने खासदार श्रीकांत शिंदे यांनी तातडीने लक्ष घालून दिवा शहर व परिसरासाठी स्वतंत्र भव्य चार मजली पोलीस स्टेशनची मागणी अखेर पूर्ण झाली आहे.

मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांनी यावेळी पहाणी केली असता जवळजवळ ९५ टक्के काम पूर्ण झाले असून लवकरच हे पोलीस स्टेशन दिवेकरांच्या सेवेत दाखल होईल असे त्यांनी बोलताना स्पष्ट केले आहे. प्रसंगी उपशहर प्रमुख शैलेश पाटील, आदेश भगत, मा. नगरसेवक. अमर पाटील, दीपक जाधव, मा. नगरसेविका दर्शना म्हात्रे,विभाग प्रमुख उमेश भगत, भालचंद्र भगत, चरणदास म्हात्रे, निलेश पाटील, अर्चना पाटील,, शशिकांत पाटील, जगदीश भंडारी, अरुण म्हात्रे, सुरेश पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## पी एच डी करून काय दिवे लावणार, वक्तव्यावर वंचित बहुजन आघाडी आक्रमक

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पी एच डी शिक्षणासंदर्भात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावर वंचित बहुजन आघाडीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "पी एच डी करून काय दिवे लावणार?" तसेच कॉलरशिपसाठी एकाच घरात पाच-पाच जण पी एच डी करतात, असे विधान करून अजित पवार यांनी उच्च शिक्षण व संशोधन क्षेत्राचा अपमान केला असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते सचिन मेघडबर यांनी



केला आहे. या संदर्भात सचिन मेघडबर यांनी प्रसिद्धी पत्रक जाहीर करून राज्य सरकारच्या भूमिकेवर कडाडून टीका केली आहे. पी एच डी व संशोधन हे देशाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे असून अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे संशोधन करणाऱ्या तरुणांच्या मनोबलावर विपरीत परिणाम होतो असे त्यांनी नमूद केले. कॉलरशिप योजना या गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी असतात. जर या योजनांमध्ये गैरप्रकार होत असतील तर त्या वर ठोस कारवाई करणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र त्याच्या नावाखाली संपूर्ण पी एच डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोषी ठरवणे चुकीचे व अन्यायकारक असल्याचे मेघडबर यांनी स्पष्ट केले. शिक्षण व्यवस्था बळकट करण्याऐवजी शिक्षित तरुणांची थट्टा करणे हे राज्याच्या भविष्याच्या दृष्टीने घातक असल्याचा आरोप ही त्यांनी केला.

या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या वक्तव्याबाबत तात्काळ जाहीर भूमिका स्पष्ट करावी तसेच संशोधक व पी एच डी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे. या प्रसिद्धी पत्रकानंतर राज्यातील राजकीय व शैक्षणिक वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटत असून या वक्तव्यावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## थोडक्यात

### वाहनाच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू तर एक जण जखमी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पेट्रोल भरण्यास स्कूटी ढकलत घेऊन जात असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून एक तरुणी जखमी झाली आहे. साक्षी अरुण पाटील (१५, रा. पाटनोली) असे मृत तरुणीचे नाव आहे; तर कृतिका दिनकर भगत (वय १५) ही जखमी झाली. या अपघातप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साक्षी पाटील ही पेट्रोल भरण्यासाठी एक्टिवा स्कुटी ढकलत घेऊन जात होती. दरम्यान, जेएनपीएवरून पळस्पेकडे येणाऱ्या सेवा रस्त्यावर पंकज पार्किंगच्या जवळ पुलाच्या खाली त्या आल्या. पुढे कुंडेवहाळ येथे अज्ञात वाहनाने साक्षी पाटील आणि तिच्यासोबत असलेली मैत्रीण कृतिका भगत यांना धडक दिली. या धडकेत साक्षीचा मृत्यू झाला.

### नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील सुशोभीकरण कामांना वेग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून २५ डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची सेवा सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने विमानतळ परिसरातील रंगरंगोटी आणि रस्ते सुशोभीकरणाच्या कामांना वेग आला आहे.विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील भिती, कम्पाउंड वॉल, फ्लायओव्हरखालील पॅनेल्स आणि रस्त्यालगतच्या संरचना नव्या डिसेंबरपासून व्यावसायिक विमानांची रंगसंगतीत नटविल्या जात आहेत. सिडकोने मुख्य कॉरिडॉरवर 'थीम-बेस्ड' भित्तिचित्रे, कलात्मक पेंटिंग आणि स्वच्छ, एकसंध लूक देणाऱ्या रंगकामाची निवड केली आहे. विमानतळाकडे जाणाऱ्या उलवेतील मुख्य मार्गावरील दुभाजक, पदपथ, दिशादर्शक फलक आणि पथदिव्यांच्या रंगरंगोटीची कामे पूर्ण झाली आहेत. रस्त्याच्या रेखांकन पट्टांचे नूतनीकरणही केले जात आहे. फ्लायओव्हरचे खांब, बस टॅक्सी ड्रॉप पॉइंट परिसर आणि भुयारी मार्गांना एकसंध रंगछटा देऊन विमानतळ परिसराचे सौंदर्य वाढविले जात आहे. रात्रीच्या वेळी या कामांना अधिक गती देण्यात आली आहे. २५ डिसेंबरपूर्वी संपूर्ण परिसर स्वच्छ, आकर्षक आणि प्रवासी-अनुकूल दिसावा यासाठी अंतिम टचअपची कामे युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली.

### ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील ४ लाख रुपये चोरटयांनी केले लंपास

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** ज्येष्ठ नागरिकाच्या बॅगेतील चार लाख रुपये खेचून दोघे जण दुचाकीवरून पसार झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात ११ डिसेंबरला गुन्हा दाखल करण्यात आला. सुबोधचंद्र मायाराम कलीता हे खारघर, सेक्टर २० येथे राहत असून, त्यांनी बँकेतून चार लाख रुपये फंडाची रक्कम काढली होती. ती रक्कम प्लास्टिकच्या बॅगमधून घेऊन ते घराकडे पायी जात होते. सेंट्रल पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील पैशांची पिशवी खेचून पळून गेले.

### शेअर मार्केट मध्ये गुंतवणुकीचे अमिश दाखवून २१ लाखांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सहा अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सुजवा चक्रवर्ती हे कळंबोली, सेक्टर १६ येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्रीमध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना शेअर मार्केट ट्रेडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हॉट्सअॅप ग्रुपवर अॅड करण्यात आले. ट्रेडिंग करायचा असल्यास अॅपवर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे गुंतवले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना १० हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी २५ हजार रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला.चांगला परतावा मिळत असल्याने ठेवला विश्वास पैसे अकाउंटवर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण २१ लाख ७४ हजार रुपये जमा केले असता अॅपवर एक कोटी रुपये दिसून आले. त्यानंतर त्यांनी पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला, मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला १० लाख रुपये 3 कमिशन भरावे लागेल, त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तळोजा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रीनुसार गुन्हा दाखल केला असून तपास सुरू केला आहे.

### नातेवाइकांनी मारला दागिन्यांवर डल्ला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** घरी पाहुणे म्हणून राहावयास आलेल्या नातेवाइकांनी दागिने चोरून नेल्याची घटना विचुंबे येथे घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. राधिका चौहान या विचुंबे येथे राहत असून त्यांचे दोन नातेवाईक त्यांच्या घरी आले होते. त्यांनी जेवण करून घरी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी सकाळी राधिका उठल्या असता त्यांना घरातील साहित्य विस्कटलेले दिसले. रोख रक्कम १५ हजार, सोन्याचे दागिने, चांदीच्या अंगठ्या, मोबाईल, मनगटी घड्याळ, एटीएम कार्ड सापडून आले नाहीत. त्यामुळे दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# रेवदंड्यात मटका छापा; 'व्यसनमुक्ती'च्या गावातच मटका, दारू, गांजा व पत्ते जुगार धडाक्यात?

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे/रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर मटका जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शुक्रवारी (दि. १२ डिसेंबर २०२५) सायंकाळी सुमारे ४.१० वाजता धडक कारवाई करत पार नाका, मौजे रेवदंडा येथे छापा टाकला. जनसेवा डेअरीच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेत ही कारवाई करण्यात आली. पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, या गुन्ह्याचे फिर्यादी रुपेश बबन निगडे (वय ४१), पोलीस हवालदार, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, रायगड-अलिबाग आहेत. या कारवाईत अनंत शंकर पाटील (वय ५४, रा. ताजपूर, पोस्ट सुडकोली, ता. अलिबाग) याला अटक करण्यात आली असून त्याच्यासह आणखी एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीकडून ३,८३० रुपये रोख रक्कम व आकडेमोड केलेल्या ११ चिठ्ठ्या असा मिळून ३,८३५ रुपयांचा जप्तमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.पोलिसांच्या मते, आरोपी अनंत पाटील हा पार नाका, रेवदंडा येथे लोकांकडून रोख रक्कम स्वीकारून चिठ्ठ्यांवर आकडेमोड लिहून "कल्याण मेन" नावाचा मटका जुगार बेकायदेशीररित्या स्वतःच्या



फायद्यासाठी चालवत होता. या जुगारातून जमा होणारी रक्कम दुसऱ्या साथीदाराकडे जमा केली जात असल्याचेही प्राथमिक तपासात समोर आले आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा (L.C.B) अलिबाग यांनी केली असून पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली रेवदंडा पोलीस करीत आहेत.'व्यसनमुक्ती'च्या गावातच मटका, दारू, गांजा, जुगार?रेवदंडा परिसरात केंद्र सरकारकडून पद्मश्री सन्मान प्राप्त एक थोर निरुपणकार लोकांना व्यसनमुक्तीचा संदेश देत वर्षानुवर्षे जनजागृती करीत आहेत. गावातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील व्यसनाधीनांना मार्गदर्शन करून ते व्यसनमुक्त करण्यासाठी मोठे कष्ट घेत आहेत. मात्र याच रेवदंडा गावात मटका जुगार, गावठी दारू, गांजा व पत्त्यांचा जुगार उघड्यावर सुरू असल्याची चर्चा सुजाण नागरिकांमध्ये चांगलीच जोर धरू लागली आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, १० रुपयांच्या पॉइंटने पत्ते खेळले जातात आणि अशाच एका पत्त्याच्या जुगारात तब्बल सुमारे २ लाख ७० हजार रुपयांचा हार-जीत व्यवहार झाल्याची चर्चा आहे. एवढेच नव्हे, तर दर वर्षी ३१ डिसेंबरच्या रात्री 'फर्स्ट इयर'च्या अखेरच्या दिवशी रेवदंड्यात अंदाजे ६ किलो गांजा विकला जातो, असा आरोप सुजाण नागरिक व पालक मंडळींमध्ये होत आहे. तरुणाईची पैशावरची मोहिनी, व्यसनांचा विळखा आणि त्यातून उध्वस्त होणारी संसाराची घडी यामुळे लोकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे.प्रशासनाची डोळेझाक? 'गोड बंगाल' की 'सेटिंग'चा खेळ?एकीकडे पोलीस मटक्यावर छोटीमोठी कारवाई करतात, तर दुसरीकडे गाव, तालुका आणि जिल्ह्यात विविध स्वरूपातील अवैध धंदे अक्षरशः राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप जनतेकडून होत आहे. स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा, महसूल व इतर संबंधित विभागांनी याबाबत डोळेझाक केल्याचा आरोपही नागरिक सर्रास करीत आहेत.काही स्थानिक सुजाण नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "काही सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बँक खाती, मोबाईल कॉल डिटेल्स, जमीनजुमला यांची सखोल चौकशी झाली, तर अवैध धंद्यांशी असलेल्या आर्थिक सांठगाठी उघडकीस येण्याची शक्यता नाकारता येत नाही." गावात 'हे नेमकं गोड बंगाल काय चाललंय?' असा जळजळीत सवाल केला जात असून, अवैध धंद्यांवर दरवाजाआड, बंद पाकिटात अनेक गुपिते लपवली गेल्याची चर्चा आहे.तरुणाई, महिला आणि कुटुंबांचे भविष्य कोण वाचवणार?मटका, दारू, गांजा, पत्ते जुगार यांसारख्या व्यसनांच्या विळख्यात सापडत असलेली तरुणाई, घर उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असलेल्या बहिणी-माताभगिनी आणि खिळखिळा होत चाललेला संसार यांचे_future कोण वाचवणार, असा कडक सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करीत आहेत. एका बाजूला व्यसनमुक्तीचे कडवे संदेश, सततचे प्रवचन आणि समाजप्रबोधन; तर दुसऱ्या बाजूला त्याच गावात नजरेसमोर चालणारे अवैध धंदे – या तीव्र विरोधाभासामुळे लोकांच्या मनात निर्माण झालेली घुसमट आता उफाळून येतानाचे चित्र आहे.मुख्यमंत्री, मुख्य सचिव आणि एसपींकडे गावकऱ्यांची नजररेवदंडा व परिसरातील अवैध मटका जुगार, गावठी दारू, गांजा व इतर जुगार अड्ड्यांवर केवळ चेहरा मोहरा कारवाई नव्हे, तर मूळ रॅकेट उद्ध्वस्त करणारी व्यापक, धडक आणि कायमस्वरूपी मोहीम राबवावी, अशी जनतेची मागणी आहे. रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जे जे जण चोरीछुपे अशा सर्व प्रकारचे अवैध धंदे करीत आहेत, त्या सर्वांवरही समान निकषाने, कोणताही राजकीय वा अन्य दबाव न मानता, कडक आणि कायदेशीर सरकारी कारवाई होणार का, याकडेही स्थानिक नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि रायगड पोलिस अधीक्षक आंचल दलाल यांनी थेट हस्तक्षेप करून अवैध धंद्यांच्या मुळावर घाव घालणारी परिणामकारक कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. "व्यसनमुक्तीची भाषा एकीकडे आणि व्यसनधंद्यांना मिळणारा आश्रय दुसरीकडे, हे दुहेरी धोरण थांबवणार कोण?" – असा टोकदार सवाल रेवदंडा परिसरातील सुजाण नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## सेलू नगर परिषद मुख्याधिकारी पदाचा कार्यभार हस्तांतरित करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** सेलू नगर परिषदेमधील मुख्याधिकारी पदाचा कार्यभार तात्काळ हस्तांतरित करावा, अशी मागणी शिवसेना पक्षाचे पदाधिकारी पवन आप्पाराव धुमरे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्या कार्यरत असलेले मुख्याधिकारी प्रशासकीय स्वरूपात कामकाज पाहत असून त्यांचा कार्यकाळ २९ डिसेंबर २०२५ रोजी संपणार आहे. मात्र त्यांच्या कार्यपद्धतीमुळे नगर परिषदेच्या हद्दीत आर्थिक नुकसान होत



असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरातील अनेक मोकळ्या जागा मनमानी व नियमबाह्य पद्धतीने वाटप करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यापैकी काही जागा बालवाडी, रस्ते तसेच सार्वजनिक वापरासाठी राखीव असून, अशा जागांचे वाटप झाल्यास भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी व अन्य नागरी अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.अनेक वर्षांपासून मोकळ्या असलेल्या या जागांची किंमत कोट्यवधी रुपयांची असून, सध्या तरी त्या ठिकाणी कोणतेही अतिक्रमण झालेले नाही. त्यामुळे भविष्यातील संभाव्य अडचणी टाळण्यासाठी मुख्याधिकारी पदाचा कार्यभार तात्काळ बदलावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल घेऊन संबंधित विभागाने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## स्कुटी ढकलताना अज्ञात वाहनाच्या धडकेत विद्यार्थिनीचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पेट्रोल भरण्यास स्कुटी ढकलत घेऊन जात असताना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत पंधरा वर्षीय साक्षी अरुण पाटील (राहणार पाटनोली) या विद्यार्थिनीचा मृत्यू झाला तर कृतिका दिनकर भगत (वय 15) ही विद्यार्थ्यांनी जखमी झाली. या अपघाताप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 13 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. 13 डिसेंबर रोजी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास साक्षी पाटील ही एक्टिवा स्कुटी क्रमांक एम एच 46 सीडी 0980 ही पेट्रोल भरण्यास ढकलत घेऊन जात असताना जेएनपीटीवरून पळस्पेकडे येणाऱ्या सर्विस रोडवर पंकज पार्किंगच्या जवळ ब्रिजच्या खाली कुंडेवहाळ येथे अज्ञात वाहनावरील चालकाने साक्षी पाटील आणि तिच्यासोबत असलेली मैत्रीण कृतीका भगत या दोघी ढकलत असलेल्या ऍक्टिवा स्कुटीला धडक दिली. या धडकेत साक्षी अरुण पाटील हिचा मृत्यू झाला तर कृतिका दिनकर भगत ही जखमी झाली. त्यानंतर अज्ञात वाहन चालक जखमींना मदत न करता पळून गेला. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत

## शिवसेना पक्षात अनेक तरुणांनी केला जाहीर पक्ष प्रवेश



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** कळंबोली वसाहती मधील अनेक तरुणांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाने प्रेरित होऊन,शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना उत्तर भारतीय सेल पनवेल तालुका प्रमुख चंद्र प्रताप प्रजापती (सी. पी.) यांच्या प्रयत्नाने विकास शर्मा, अभिनेता सिंह, रंजीत सिंह, गोवर्धन प्रचारपाते, राजनाथ पासवान, आशिष राजपुत्र, अभिषेक राजपुत, विरेन्द्र साह, आकाश सिंह, बाबू चौहान, विन्दु प्रजापति, प्रयोग शाह, अरविन्द पॉल, सत्यनारायण शर्मा यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.या वेळी इतर पदाधिकारी आणि आदी मान्यवर उपस्थित होते.

## जय भवानीच्या हंसराज जयस्वाल याची जुडो मध्ये राष्ट्रीय पातळीवर निवड

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** येथील जय भवानी महाविद्यालयाचा खूळाडू हंसराज जयस्वाल यांने जुडो राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्या बद्दल हंसराज जयस्वाल याचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. हंसराज जयस्वाल यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री मा.श्री.शिवाजीरावदादा पंडित, अध्यक्ष माजी आ.अमरसिंह पंडित,सचिव, मा.श्री.जयसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, युवा नेते मा.श्री.रणविर काका पंडित, मा.श्री. पृथ्वीदादा पंडित, श्री.अमृत डावकर सर, श्री.प्रमोद गोरकर, श्री.प्रताप हातोटे, श्री.



काशीनाथ गोगुले, श्री.दिलीपराव जाधव, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम, प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, प्रा.डॉ.सुनिल जाधव, प्रा. सोमनाथ घाडगे यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. हंसराज जयस्वाल यास क्रिडा विभागा प्रमुख प्रा. प्रविणकुमार शिलेदार यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले आहे.

त्यांचे व खेळाडू हंसराज जयस्वाल यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन!होत आहे.

## एरंडोलचे कुस्तीगीरांची राष्ट्रीय स्तरावर निवड

**दैनिक युवक आधार**

**विशेष प्रतिनिधी/ स्वप्निल पाटील एरंडोल :** एरंडोल येथील गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.गुरु हनुमान कुस्तीगीर संस्थेच्या प्रेरणा अनिल मराठे हिची 62 किलो वजन गटात राष्ट्रीय स्तरावर कुस्ती स्पर्धेसाठी तर सुजल अनिल भोई याची 55 किलो ग्रीक रोमन वजन गटात राज्यस्तरावर कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली याबद्दल संस्थाअध्यक्ष भानुदास आरखे उपाध्यक्ष पंकज पाटील,अनिल



मराठे ,दिलीप सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रेरणा व सुजल यांचा सत्कार केला. या निवडीमुळे आमदार अमोल पाटील, एडवोकेट किशोर काळकर ,प्राध्यापक मनोज पाटील आनंद दाभाडे,पंकज पाटील,संजय काबरा संस्थेचे सर्व संचालक मंडळ मान्यवरांसह परिसरात सर्वांकडून कौतुक करण्यात येत आहे

## श्रीमती सौभाग्यवती राव (नर्रा) यांच्या निधनानिमित्त शोकसभा

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** सद्गुरू श्री श्री साखर कारखाना लि., श्रीनगर (राजेवाडी), ता. आटपाडी येथील चेअरमन श्री. एन. शेषागिरी रावसर यांच्या मातोश्री श्रीमती सौभाग्यवती राव (नर्रा) (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.

त्यांच्या निधनानिमित्त सद्गुरू श्री श्री साखर कारखाना लि., श्रीनगर (राजेवाडी) येथील प्रशासकीय कार्यालयासमोर शोकसभा आयोजित करण्यात



आली होती. या शोकसभेस कारखान्यातील सर्व खातेप्रमुख, कामगार, कर्मचारी तसेच सद्गुरू परिवारातील सदस्य उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी श्रीमती सौभाग्यवती राव (नर्रा) यांच्या जीवनातील आठवणींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याचा गौरव केला. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे, सुसंस्कार आणि शिस्तप्रिय जीवनशैलीमुळे त्यांनी समाजात मानाचे स्थान निर्माण केल्याचे मत व्यक्त करण्यात आले. त्यांच्या निधनाने सद्गुरू परिवारात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शेवटी त्यांच्या आत्म्याला शांती लाभावी, यासाठी उपस्थितांनी मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली.

# पनवेल महापालिकेचा विकास अविरत सुरू राहील – प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण

## सुमारे ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेलचे झपाट्याने नागरीकरण होत असून हे क्षेत्र एज्युकेशन हब म्हणून पुढे येत आहे. पनवेल महापालिकेचा सर्वांगीण विकास व्हावा, या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पनवेल महापालिका दत्तक घेतली आहे. त्यामुळे यापुढेही नागरिकांचे प्रश्न मार्गी लावतानाच विकासाची गंगा अविरतपणे सुरू राहील, अशी ग्वाही भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी आज येथे दिली.

कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये सुमारे ३२५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने पनवेल येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात मार्गदर्शनात्मक कार्यक्रम माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, माजी महापौर कविता चौतमोल, आयुक्त मंगेश चितळे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, आरपीआयचे प्रभाकर कांबळे यांच्यासह माजी नगरसेवक, माजी नगरसेविका उपस्थित होते.

पिसार्वे तलाव पुनजिवीत व सुशोभिकरणाचा लोकार्पण, कोयनावेळे व घोट या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावरील तळोजा नदीवरील पुलाचे लोकार्पण, खारघर सेक्टर-१९ मधील भूखंड क्र.१४ येथे प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, सेक्टर-३६ मधील भूखंड क्र. १३ येथे नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र लोकार्पण, कळंबोली सेक्टर-०८ मधील सन शाईन सोसायटी पर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे लोकार्पण, सेक्टर-०८-ई मधील भूखंड क्र. ६, ७ व ८ येथील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, कामोठे सेक्टर-११ मधील भूखंड क्र. १-बी येथील प्रभाग कार्यालयाचे लोकार्पण, नवीन पनवेल सेक्टर-१८ मधील भूखंड क्र. ८-अ, ८-ब या भूखंडावर उभारण्यात येणाऱ्या माता व बालसंगोपन केंद्राचे भूमिपूजन, पनवेल बसस्थानकामागे येथे प्रधानमंत्री आवास योजना व मुख्यमंत्री आवास योजनेतंर्गत कुष्ठरोग पिडीतांसाठी व खुल्या विक्रीसाठी प्रस्तावित गृह प्रकल्पाचे भूमिपूजन, तक्का येथे डोमिनोज समोरील मोकळी जागा येथे कोळी समाजाचे शिल्पचे लोकार्पण, पनवेल महानगरपालिका हद्दीतील लायन्स गार्डन ते पी.डब्ल्यू.डी. ऑफीस ते जुने कोर्ट ते बंदर नाका कॉंक्रीटीकरण रस्त्याचे भूमिपूजन, लोकनेते दि.बा. पाटील शाळा येथे लोकनेते दि. बा. पाटील यांच्याबद्दल माहिती दर्शविणारे म्युरल व सुशोभित कक्षाचे लोकार्पण, प्रभाग समिती- ड येथील भूखंडावर व्यावसायिक दुकाने बहुमजली वाहनतळाच्या कामाचे भूमिपूजन झाले.

प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आपल्या भाषणातून मार्गदर्शन करताना सांगितले कि, पूर्वी नगरपरिषद असलेल्या पनवेलचा महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर या भागाचा विकास व्हावा, ही लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची नेहमीच तळमळ राहिली आहे. पनवेल महापालिकेच्या निर्मितीपासून ते तिच्या वाढीपर्यंत मी साक्षीदार आहे. महापालिकेच्या स्थापनेपासूनच पनवेलच्या विकासकामांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांचा सातत्यपूर्ण आग्रह राहिला असल्याचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी अधोरेखित केले. द्रष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून महापालिकेला बळ देण्याचे काम सुरू असून नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. आज या कामांचे लोकार्पण व भूमिपूजन होत असताना पनवेलमध्ये आश्वासक कार्य झाल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे त्यांनी नमूद केले. पनवेल महापालिकेची भव्य प्रशासकीय इमारत कोकण व मुंबईचे प्रवेशद्वार ठरत आहे. १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय पूर्णत्वास गेले आहे. माता-भगिनींसाठी सुसज्ज रुग्णालय उभारण्यात येत आहे. वैद्यकीय सुविधांच्या विस्तारासाठी आमदार प्रशांत ठाकूर हे नेहमीच आग्रही राहिले आहेत. महापालिकेच्या शाळा सुसज्ज व दर्जेदार असून लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून सिडकोकडून ३४१ भूखंड महापालिकेकडे वर्ग करण्यात आले असून याचा मोठा फायदा महापालिकेला झाला आहे. नव्याने स्थापन झालेली महापालिका असली तरी पनवेलमध्ये विकासाचे पर्व कायम राहणार असून स्पष्ट विचारधारा व दूरदृष्टी ठेवून काम सुरू आहे. अल्पावधीतच पनवेल महापालिकेने नागरिकांना केंद्रबिंदू मानून प्रभावी कामगिरी केली आहे. गतिमान, प्रगतिवान आणि आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून आमदार प्रशांत ठाकूर व व्यासपीठावरील सर्वांच्या पाठपुराव्यामुळे लवकरच पनवेल महापालिका 'ड' वर्गातून 'क' वर्गात जाईल, असा विश्वासही प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे स्वागत व आभार व्यक्त केले. त्यांनी पुढे म्हंटले कि, आपले शहर मोठे आणि सक्षम व्हावे हि प्रत्येकाची भावना असते. आणि त्या अनुषंगाने महानगरपालिका कायम प्रयत्नशील राहिली आहे. त्यामुळे झपाट्याने विकासाची गंगा आली. ग्रामीण भागाला विशेषतः २९ गावांचा समावेश महापालिकेत झाला त्या ग्रामीण भागाला प्रथम सुविधा दिल्या पाहिजेत यासाठी काम झाले. आमदार म्हणून न्हावा शेवा टप्पा ३ कामाचा पाठपुरावा सुरु केला आणि त्यानुसार फेब्रुवारी २०२६ ला हे काम पूर्ण होणार असून त्यामुळे मुबलक आणि नियमित पाणी मिळणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर शिलार धरणातून पनवेलला पाणी उपलब्धता होणार आहे त्याबद्दल गणेश देशमुख व मंगेश चितळे यांचे त्यांनी आभार व्यक्त केले. खारघर टोल चा प्रश्न होता तेव्हा देवेंद्रजी प्रदेशाध्यक्ष होते. त्यांनी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी टोल माफी करण्याचे आश्वासन मला दिले आणि त्यांनी तो शब्द खरा केला. सिडकोकडे अनेक भूखंड होते ते मी अध्यक्ष असताना महापालिकेला वर्ग करून परत मिळवता आले. मैदाने, बगीचे,आरोग्य केंद्रे, अशीही अनेक कामे मार्गी लागली विशेष म्हणजे सर्वात जास्त आरोग्य केंद्र असलेली पनवेल महानगरपालिका ठरली आहे. महापालिकेला विकासाचे रूप मिळाले आणि ते रूप प्रत्यक्षपणे साकार होत आहे. आणि पुढील काळातही हा ओघ सुरूच राहणार आहे. महानगरपालिकेला विकासाचे ठोस स्वरूप मिळाले असून तो विकास प्रत्यक्षात साकार होत आहे. पुढील काळातही हा विकासाचा प्रवाह सुरूच राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेलचे नाव जागतिक नकाशावर झळकले आहे. जनतेने वेळोवेळी दिलेल्या आशीर्वादांमुळेच हे शक्य झाले असून पुढेही हेच पाठबळ मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पनवेल महानगरपालिकेने उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल आयुक्त मंगेश चितळे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. आमदार विक्रांत पाटील यांचेही यावेळी भाषण झाले, प्रास्ताविक आयुक्त मंगेश चितळे यांनी केले, त्यांनी विकासकामांच्या संदर्भात सविस्तर माहिती दिली.

# कोळी मच्छीमार बांधवांचा आझाद मैदानात भव्य लक्षवेधी मूक मोर्चा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** कोळी मच्छिमार बांधवांच्या न्याय हक्कासाठी आझाद मैदांत भव्य लक्षवेधी मूक मोर्चा काढून सरकारचे लक्ष वेधण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत कोळी समाजाचे नेते आमदार रमेशदादा पाटील यांनी दिली.

मुंबईतील ससून डॉक मासेमारी बंदरावरील गोडाऊन बंद केल्याच्या निषेधार्थ कोळी महासंघ व ससून डाक मासेमारी बंदर बचाव कृती समिती तसेच महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, महाराष्ट्र राज्य मच्छीमार सहकारी संघ, मच्छीमार सर्वोदय सहकारी सोसायटी लि. कुलाबा कफ परेड, श्री मार्तंड प्रसन्न कुलाबा मत्स्योद्योग विविध कार्यकारी सोसायटी लि. कुलाबा, मल्हारी मार्तंड मच्छीमार सोसायटी रेवस, ससून डॉक मासे विक्री महिला बेल्फर असोसिएशन कुलाबा, दर्यावती महिला संघ व इतर मच्छीमार संस्था/संघटना यांच्या वतीने १६ डिसेंबर रोजी ससून डॉक ते आझाद मैदान भव्य लक्षवेधी मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ नोव्हेंबर रोजी मुंबई पोर्ट ट्रस्ट




प्राधिकरणाने मुंबईतील ससून डॉक येथील गोडाऊन बंद करण्याची कारवाई केली आहे. यामुळे कोळी मच्छीमार बांधवांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष पसरला आहे. त्यामुळे ससून डॉक येथील बंद केलेली गोडाऊन उघडणे. ससून डॉक येथे सुसज्ज अत्याधुनिक सुविधांसह बंदर उभारणे. १०० मीटर जेट्टी वाढविणे, राणी जाधव यांनी ससून डॉक संदर्भातील दिलेल्या अहवालामध्ये फेरबदल करणे. ससून हॉक स्वयं पुनर्विकास करण्यासाठी मिळावेत. मुंबईतील कोळीवाड्यांच्या झालेल्या सीमांकनाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देऊन कोळीवाड्यांचा डी.सी.आर. मंजूर करावा. महाराष्ट्रातील आदिवासी कोळी बांधवांना जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळण्याकरिता २०/१०/२०२३ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सहयादी अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली तात्काळ समिती गठित करणे.

तामिळनाडू व आंध प्रदेश राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातील मच्छीमारांना पावसाळी हंगामातील मासेमारी बंदी कालावधीत खावटी अनुदान देणे. तसेब याकरिता येणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये आर्थिक तरतूद करावी. किनारपट्टीवरील मच्छीमारांचा मासे सुकवणे, मासे उतरविणे, मासळीवर प्रक्रिया करणे व जाळी विणणे याकरीता असणाऱ्या जागांवर हक्क राहिला पाहिजे. मच्छी मार्केटच्या पुनर्विकासाच्या धोरणात सुधारणा करणे व खाजगी मार्केटमध्ये आवश्यक सोयी सुविधा देणे. जमशेदजी बंदर, कुलाबा आणि गिरगाव ही मासेमारी बंदरे हटवण्यात आली आहेत ती परत लिस्टवर घेणे. मुंबई पोर्ट ट्रस्ट या प्राधिकरणांतर्गत असलेले कोळीवाडे (मच्छीमार वसाहती), मच्छीमारांच्या पारंपारिक व्यवसायाच्या जागा या बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या स्वतंत्र धोरणातून वगळण्यात याव्यात. मुंबईतील प्रसिद्ध क्रॉफर्ड मार्केट हे स्थलांतर न करता त्यांना तिथेच तळ मजल्यावर जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

# भावनांच्या धाग्यात गुंफलेली नाती : आयुष्य फुलवणारी — अस्मिता चौगुले



**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** आयुष्य खरंच सुंदर आहे — माणसांनी, नात्यांनी, आठवणींनी आणि भावनांनी विणलेलं. मात्र अनेकदा नाती कोमेजतात, कारण भावना असूनही व्यक्त केल्या जात नाहीत. आवड आहे तरी ती सांगितली जात नाही, काळजी आहे तरी ती दाखवली जात नाही. आपण गृहीत धरतो "त्यांना कळेल," पण वास्तव असे की कोणीही अंतर्यामी नसतं. जे मनातलं बोललं जात नाही, ते समोर पोहोचतच नाही; कधी पोहोचतं, तेही अर्धवट, ज्यामुळे नातं जुळण्याऐवजी तुटतं.एखादी व्यक्ती आपल्याला आवडते, तेव्हा ती आवड फक्त आकर्षणापुरती मर्यादित नसते. त्यांच्या कला, विचारांची पद्धत, हसणं, बोलण्याची शैली, आवाजातील गोडवा, सकारात्मक ऊर्जा किंवा जगण्याकडे पाहण्याची दृष्टी — या सगळ्या गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देतात. या गुणांचं मनापासून कौतुक करणं म्हणजे त्या व्यक्तीच्या अस्तित्वालाच मान देणं होय. हे कौतुक वरवरचं नसून, त्यातून आदर, आपुलकी आणि प्रामाणिकपणा व्यक्त होतो.भावना व्यक्त केल्याने नात्यांमधील संवाद खुला होतो. समोरच्या व्यक्तीला आपल्या आयुष्यातलं स्वतःचं स्थान कळतं. "मी महत्त्वाचा/ महत्त्वाची आहे" ही जाणीव माणसाला भावनिक सुरक्षितता देते. जेव्हा नात्यांमध्ये सकारात्मक शब्दांचा आणि भावनांचा वापर होतो, तेव्हा विश्वास वाढतो आणि नातं अधिक घट्ट होतं. साध्या शब्दांत सांगायचं झालं तर, कौतुक हे नात्याला दिलेलं प्रेमाचं इंधन आहे.मात्र शब्दांतील कौतुक पुरेसं नसतं. त्याला काळजीची जोड असणं तितकंच आवश्यक आहे. एखाद्याची काळजी आहे हे फक्त मनात ठेवून चालत नाही; ती स्पष्ट शब्दांत सांगावी लागते आणि कृतीतून दाखवावी लागते. वेळ काढून विचारपूस करणं, लक्ष देऊन ऐकून घेणं, गरज असताना साथ देणं, किंवा फक्त "तू ठीक आहेस ना?" असा साधा प्रश्न विचारणं या छोट्या कृती काळजीची खरी भाषा बोलतात.नात्यांमधील बहुतांश गैरसमज "त्यांना कळेल" या चुकीच्या अपेक्षेतून निर्माण होतात. प्रत्यक्षात अपेक्षेपेक्षा संवाद अधिक गरजेचा असतो. शब्द आणि कृती जेव्हा एकमेकांना पूरक ठरतात, तेव्हाच नातं मजबूत होतं. शब्दांशिवाय भावना हरवतात आणि कृतीशिवाय शब्द पोकळ ठरतात.भावना व्यक्त करणं ही कमजोरी नाही, तर ती भावनिक समजूतदारपणाची आणि परिपक्वतेची खूण आहे. एखाद्याच्या गुणांची दखल घेतली जाते, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो. "माझ्यात काहीतरी चांगलं आहे," "माझी किंमत आहे," ही भावना माणसाला अधिक सकारात्मक, स्थिर आणि आनंदी बनवते. अशा नात्यांमध्ये माणूस स्वतःसारखा राहू शकतो, हेच तर नात्याचं खरं सौंदर्य आहे.

आजच्या धावपळीच्या, तणावपूर्ण जगात आपण अनेक गोष्टी मिळवतो, पण अनेक भावना हरवतो. समाजाला सर्वाधिक गरज आहे संवेदनशीलतेची थोडं थांबून ऐकण्याची, समजून घेण्याची आणि मनापासून बोलण्याची. नाती आपोआप टिकत नाहीत; ती जपावी लागतात. नात्यांची काळजी दोन्ही बाजूला असायला हवी, नाहीतर एकजण नातं निभावतोय आणि दुसरा फक्त बेफिकीरपणे जगतोय; अशा परिस्थितीत जो प्रामाणिकपणे निभावतो त्याला गृहित धरलं जातं. म्हणूनच, भावना गृहीत धरू नयेत. कौतुक मनात ठेवू नये, ते शब्दांत व्यक्त करावं. काळजी फक्त वाटू नये, ती कृतीतून दिसावी. कारण आयुष्य खरंच सुंदर आहे आणि आपल्या शब्दांनी, कृतींनी आणि प्रामाणिक भावनांनी ते आयुष्य आणि नाती दोन्ही अधिक सुंदर होऊ शकतात.

# दिघोरी / मोठी येथे नागपूर विभागीय ग्रंथालय संघाचे अधिवेशन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे :** भंडारा -नागपूर विभाग ग्रंथालय संघ, भंडारा जिल्हा ग्रंथालय संघ, व सुबोध सार्वजनिक वाचनालय दिघोरी मोठी यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय अधिवेशन दिनांक-14 डिसेंबर 2025 रोज रविवारला स्थळ- जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणामध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटक - संचालक भंडारा डिस्ट्रिक्ट सेंटर को-ऑपरेटिव बँक लिमिटेड भंडारा माननीय धर्मेंद्र बोरकर, यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ - डॉक्टर गजाननराव कोटेवार, नागपूर विभाग ग्रंथालय संघ शिव कुमार शर्मा, प्रमुख कार्यवाह नागपूर विभाग ग्रंथालय संघ - भाऊराव पत्रे, प्रदेश सचिव भारतीय राष्ट्रीय युवक कॉंग्रेस मनोज बागडे, कार्याध्यक्ष नागपूर विभाग ग्रंथालय संघ अनिल बोरगमवार, कार्यवाह नागपूर विभाग ग्रंथालय संघ नंदू बनसोड, अध्यक्ष भंडारा जिल्हा ग्रंथालय संघ - धनंजय दलाल, अध्यक्ष नागपूर जिल्हा ग्रंथालय संघ - प्रेम राज कुबडे, अध्यक्ष गडचिरोली जिल्हा ग्रंथालय संघ - जगदीश मस्के, जिल्हा ग्रंथालय अधिकारी भंडारा-खोमें द्र बोपचे, संस्थापक सुबोध




सार्वजनिक वाचनालय - डॉक्टर रूपचंद्र निखाडे, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक दिलीप चिमणकर इत्यादी मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी राजकुमार हटवार, शंकरराव लोहकरे, प्रबोधनकार भीम शाहीर प्रदीप कडबे, कैलास समरीत, सागर लोंढे, मुकेश गजभिये, कंठीराम दंडारे, गुरुदास डोंगरे, चिंतामण राऊत, नरेंद्र चौरागडे, इत्यादी मोठ्या संख्येने ग्रंथालय कर्मचारी ग्रंथालय कार्यकर्ते गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाईबाजार सिंदखेड ला108 रुग्णवाहिका द्या

## पिंटू पाटील वायफनिकर यांची आ हेमंत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

### लवकरच रुग्णवाहिका उपलब्ध करून देणार; आ. हेमंत पाटील यांचे पिंटू पाटील वायफनीकर यांना आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर : प्रतिनिधी)**

**सय्यद ईसा :** माहूर तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या वाईबाजार आणि अतिदुर्गम भागात असलेल्या सिंदखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांना 108 रुग्णवाहिकेची नितांत आवश्यकता असल्याने पिंटू पाटील वायफनिकर यांनी नांदेड येथे आमदार हेमंत पाटील यांची भेट घेऊन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदन देऊन दि 15 रोजी केली असता लवकरच रुग्णवाहिका उपलब्ध करून देऊन असे आश्वासन आ हेमंत पाटील यांनी पिंटू पाटील वायफनिकर यांना दिले



माहूर तालुक्यातील अनेक खेडी गावे, अतिदुर्गम भागात असून जाण्या येण्यासाठी व्यवस्थित रस्ते नसल्याने पावसाळ्यात अनेक गावकऱ्यांचे उपचार मिळवून घेण्यासाठी प्रचंड हाल झाले अनेक पदाधिकाऱ्यांना ज्या गावातून मतदान मिळाले नाही त्या गावात शासकीय सुविधा फिरकु ही देत नाहीत त्यामुळे गोरगरीब नागरिकांचे उपचारासाठी प्रचंड हाल होतात ही बाब हेरून पिंटू पाटील वायफनिकर यांनी नुकताच वायफनि येथे आशीर्वाद पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ सर्व रोग निदान शिबिर घेऊन चष्म्याचे वाटप तथा रक्तदान शिबिर घेत जनसेवेचा वसा अविरत चालूच ठेवलेला असून अनेक रुग्णांना आपल्या स्वतःच्या खाजगी वाहनाने यवतमाळ पुसद येथे नेऊन अनेकांचा जीव वाचवलेला आहे

वाई बाजार आणि सिंदखेड येथील आरोग्य व्यवस्था पाहता येथून रेफर होणाऱ्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे यामध्ये हृदयाघात सर्पदंश अपघात गरोदर माता सह इतर गंभीर आजारांचे रुग्ण खाजगी रुग्णवाहिका किंवा भाड्याने वाहन घेऊन यवतमाळ पुसद येथे जाऊन उपचार करून घेतात त्यामुळे त्यांना मानसिक व आर्थिक फटका बसत आहे नागरिकांना आरोग्य सेवा मोफत मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याने 108 रुग्णवाहिकेची मागणी नांदेड येथे जाऊन आ हेमंत पाटील यांचे भेट घेऊन निवेदन दिले यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वैद्यकीय कक्ष प्रमुख मंगेश चीवटे उपस्थित होते यावेळी आ हेमंत पाटील एन एच एम च्या सचिव कादंबरी बेलखोडे यांनी आमदार हेमंत पाटील यांच्या मागणीवरून 25 रुग्णवाहिका मंजूर केल्याने त्या पैकी तात्काळ आपल्या मागणीनुसार रुग्णवाहिका उपलब्ध होतील असे आश्वासन पिंटू पाटील यांना दिले.

# विश्रामधाम कौटुंबिक जिव्हाळा जपणारे केंद्र बनेल : रामशेठ ठाकूर

## महेंद्रशेठ घरत यांची मुंबई मराठी पत्रकार संघाला पाच लाखांची देणगी जाहीर

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** "बातम्यांच्या रोजच्या धकाधकीत पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी क्षणभर विश्रांतीसाठी मुंबई मराठी पत्रकार संघाने लोणावळा येथील दी. गो. तेंडुलकर स्मृतिमंदिरातील विश्रामधामाचे हाती घेतलेले नूतनीकरण वेळेत पूर्ण होईल, असा आशावाद व्यक्त करीत हे विश्रामधाम कौटुंबिक जिव्हाळा जपणारे केंद्र बनेल," अशा शब्दांत माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. २० लाख रुपयांची वैयक्तिक देणगीही त्यांनी या वेळी जाहीर केली.

या विश्रामधाम नूतनीकरणासाठी रामशेठ ठाकूर यांनी आतापर्यंत एकूण ७० लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांनीही या उपक्रमासाठी पाच लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

"मुंबई मराठी पत्रकार संघ हा सर्वाधिक जुना आहे. या पत्रकार संघाची धुरा अनेक महनीय संपादक-पत्रकारांनी वाहिली आहे. माझी वाटचाल पत्रकारांबाबत नेहमीच आदरभाव आणि सकारात्मक भूमिका घेऊन सुरू आहे. गेली ३५ वर्षे मी जिल्ह्यातील पत्रकारांना सहकार्य करतोय. त्यांची प्रत्येक दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न करतोय. त्यामुळे मुंबई मराठी पत्रकार संघाला सहकार्य करणे हे माझे कर्तव्य आहे. त्याच भावनेतून मदतीचा हात मुंबई मराठी पत्रकार संघाला देत आहे," अशा भावना आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी लोणावळा येथे व्यक्त केल्या. शुक्रवारी (ता. १२) माजी खासदार रामशेठ ठाकूर आणि महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते विश्रामगृहाच्या नूतनीकरणाचे भूमिपूजन झाले.

लोणावळा येथील विश्रामधामाच्या नूतनीकरणाच्या पायाभरणी समारंभात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कामगार नेते महेंद्र घरत, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, पन्नास वर्षापूर्वी



विश्रामधाम उभारणीत सक्रिय सहभाग असलेले माजी अध्यक्ष कुमार कदम, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले, अजय वैद्य, प्रकल्प निरीक्षक दीपक म्हात्रे, वास्तुविशारद मनोज गोलतकर, राजू माळी आणि वाय. टी. देशमुख आणि कार्यकारिणी सदस्य तसेच अनेक पत्रकार उपस्थित होते.

स्वप्नपूर्तीच्या दिशेने पहिले दमदार पाऊल मुंबई मराठी पत्रकार संघाने टाकले आहे. येत्या मार्चपर्यंत हे अद्ययावत विश्रामधाम उभे राहील, असे आश्वासन अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिले. दी. गो. तेंडुलकरांच्या या स्मृती केंद्रास त्यावेळी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७४ साली एक हजार रुपयांची देणगी दिली होती. पत्रकार संघाच्या या भिंतींनी गेली ५० वर्षे अनेक जिव्हाळ्याच्या आठवणी जतन करून ठेवल्या आहेत आणि म्हणूनच हा जिव्हाळा जपून या विश्रामधामाचे नूतनीकरण केले जाईल, असे संदीप चव्हाण म्हणाले.

पत्रकारांच्या या विश्रामधामाच्या उभारणीत अनेकांचे श्रम आहेत. मीही अनेक सामाजिक संस्थात रामशेठजींच्या पावलावर पाऊल ठेवून चालण्याचा प्रयत्न करतो. माझ्यातर्फे मी ५ लाखाची देणगी तर पत्रकार संघाला देत आहेच, पण भविष्यातही मी पत्रकार संघासोबत कायम जोडला जाईन, असेही महेंद्रशेठ घरत म्हणाले.

या वास्तूच्या उभारणीसाठी पत्रकार संघाच्या तत्कालीन कार्यकरिणी सदस्यांनी खूप हालअपेष्टा सोसल्या. त्या सगळयांच्या वतीने मी आज हा सत्कार स्वीकरत असल्याची कृतज्ञ भावना माजी अध्यक्ष कुमार कदम यांनी व्यक्त केली.


पत्रकार संघात वैविध्यपूर्ण उपक्रम राबवत असतानाच विश्रामधाम नूतनीकरणाचे शिवधनुष्य आम्ही उचलले आहे. सर्व कार्यकारिणी आणि विश्वस्तांचे आम्ही त्यासाठी आभारी आहोत, अशी भावना कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यवाह शैलेंद्र शिर्के यांनी व्यक्त केली. निवेदन उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर यांनी केले.

यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभागी झालेले मुंबई मराठी पत्रकार संघाचे कलावंत देवदास मटाले, स्वाती घोसाळकर, रश्मी महांबरे, प्रशांत चिडे, सिध्देश शिगवण, सुरेश ठुकरूल आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचा विशेष सत्कार रामशेठ ठाकूर आणि महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माजी अध्यक्ष नरेंद्र वाबळे, प्रसाद मोकाशी, तसेच मुंबई मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.

## थोडक्यात

### बेपत्ता अल्पवयीन मुलीचा शोध



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/ वार्ताहर खारघर :** दि. २८ मार्च २०२५ रोजी खाली नमूद केलेली अल्पवयीन मुलगी आपल्या राहत्या घरातून कोणालाही न सांगता बेपत्ता झाली असून तिचा शोध सुरू आहे. मुलीचे नाव : कु. फातीमा खुर्शीद शेख, वय : १५ वर्षे ८ महिने,धंदा : नाही,रंग : गोरा, चेहरा : गोल, उंची : सुमारे ५ फूट, शरीरयष्टी : सडपातळ, डोळे : काळे,केस : छोटे कापलेले ओळख चिन्ह : पाठीवर काळ्या रंगाचा जन्मखूण. तसेच घातलेला पोशाख : रंगीत सलवार कमीज, काळ्या रंगाचा हिजाब,नाकात सोन्याची नथ, पायात चांदीच्या पट्ट्या व शूज.भाषा : मराठी व हिंदी बोलते. सदर मुलगी दिनांक २८/०३/२०२५ रोजी रात्री ०९.३० वाजताभगवान शेठचाळ, हनुमान मंदिरचाळ, सेक्टर क्र. १३, खारघर, नवी मुंबई येथून बेपत्ता झाली आहे. सदर मुलगी किंवा तिच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ खालील क्रमांकावर संपर्क साधावा. पोलीस उपनिरीक्षक श्री. सुजीत ठाकूर, मोबाईल : 95185 41102 खारघर पोलीस ठाणे, नवी मुंबई.

### आठ तोळ्याचे सोन्याचा हार आणि चैन खेचून चोरटे पसार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पायी चालत जाणाऱ्या 45 वर्षीय महिलेच्या गळ्यातील आठ तोळे वजनाचा सोन्याचा हार आणि सोन्याची चैन खेचून दोघेजण मोटरसायकल वरून पळून गेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 13 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.कुंदा गावंड या करंजाडे, सेक्टर आर 5 येथे राहत असून त्या 12 डिसेंबर रोजी लक्ष्मीनारायण मंदिर लग्नाला जात होत्या. रात्री पावणेदहाच्या सुमारास वाघिवली वाडी, सेक्टर आर 5 येथून रस्त्याने पायी चालत जात असताना काळ्या रंगाच्या मोटरसायकल वरून दोन इसम आले आणि त्यांनी त्यांच्या गळ्यातील चैन आणि हार मानेला हीसका देऊन जबरदस्तीने खेचले. यात कुंदा गावंड जमिनीवर पडल्या आणि ते दोघेजण पळून गेले.

### चार लाख रुपये खेचून चोरटे पसार

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 65 वर्षीय जेष्ठ नागरिकाच्या बॅगेतील चार लाख रुपये रोख रक्कम जबरदस्तीने खेचून दोघेजण मोटरसायकल वरून पसार झाले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात 11 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.सुबोध चंद्र मायाराम कलीता हे खारघर, सेक्टर 20 येथे राहत असून ते 11 डिसेंबर रोजी प्लास्टिक बॅग मध्ये चार लाख रुपये फंडाची रक्कम काढून घराकडे पायी जात होते. सेक्टर 19 बँकेसमोरून जात असताना रस्ता क्रॉस करत होते. सेंट्रल पार्क कडे जाणाऱ्या रस्त्यावर पाठीमागून आलेल्या दोघांनी त्यांच्या हातातील पैशांची पिशवी खेचून ते पळून गेले.

### विवाहितेवर अत्याचार प्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** तळोजा परिसरात राहणाऱ्या तीस वर्षीय विवाहितेवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी संदीप (पूर्ण नाव माहिती नाही) याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 12 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. तीस वर्षीय विवाहित महिला पती आणि मुलासह राहत असून आरोपी संदीप याने महिलेला मे महिन्यात प्रपोज केला. यावेळी महिलेने नकार दिला. त्यानंतर जून 2025 मध्ये महिलेच्या घरात प्रवेश करून आरोपीने तिच्यावर अत्याचार केला आणि लहान मुलाला आणि पिडीतेला मारण्याची धमकी दिली. त्यानंतर जुलै महिन्यात पुन्हा अत्याचार केला.

## होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत वसुंधरा विद्यालयाची दैदीप्यमान कामगिरी ५१ विद्यार्थ्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (वार्ताहर) :** बॉम्बे टीचर्स असोसिएशनतर्फे घेण्यात येणाऱ्या डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा २०२५–२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, आष्टी येथील वसुंधरा प्राथमिक विद्यालयाने या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विज्ञान विषयातील कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत इयत्ता सहावी व नववीतील मिळून तब्बल ५१ विद्यार्थ्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली असून, ही कामगिरी शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष देणारी ठरली आहे. इयत्ता नववीतील एकूण ७३ विद्यार्थ्यांपैकी ६० विद्यार्थी परीक्षा उत्तीर्ण झाले असून, त्यापैकी २२ विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले आहेत. या विद्यार्थ्यांनी परीक्षेतील लेव्हल–१ मध्ये यश संपादन करून पुढील वाटचालीसाठी भक्कम पाऊल टाकले आहे.

तसेच, इयत्ता सहावीतील ५३ विद्यार्थ्यांपैकी ४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यातील २९ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक (दुसरी) फेरीसाठी निवड झाली आहे. प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश उल्लेखनीय मानले जात आहे.

हे यश वसुंधरा विद्यालयाचे संस्थापक माननीय श्री. मनोजजी धस यांच्या प्रेरणेने तसेच विज्ञान विषयाचे शिक्षक श्री. काळे एस. जे., श्री. ननवरे जी. ए. व श्रीमती. कुमकर आर. झेड. यांच्या मार्गदर्शनामुळे शक्य झाल्याचे शाळा प्रशासनाकडून नमूद करण्यात आले.या यशाबद्दल वसुंधरा प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती बोंदार्डे, वसुंधरा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. भालेराव तसेच प्रशालेतील सर्व शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील फेरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षेतील हे घवघवीत यश म्हणजे वसुंधरा प्राथमिक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची विज्ञानातील प्रगती अधोरेखित करणारे आहे. प्रात्यक्षिक फेरीसाठी निवड झालेले इयत्ता सहावीतील विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत

1. आर्यन अशोक झेंडे
2. स्तवन संदीप मस्के
3. सुयोग विकास धस
4. अविष्कार अनिरुद्ध चव्हाण
5. चंचल विक्रम कावळे
6. सार्थक संदीप घोडके
7. वरद दादासाहेब चव्हाण
8. प्रसाद भागवत कोकणे
9. श्रेया बळी जायभाय
10. आरोही दिलीप गालफाडे
11. जानवी सचिन पवार
12. राज संजय गरजे
13. अंजली गणेश गरड
14. शिवांजली हनुमान भिसे
15. समृद्धी अनिल यादव
16. प्रणित रामेश्वर देसाई
17. संग्राम संभाजी भोगाडे
18. श्रेयस संतोष खंडागळे
19. साक्षी संतोष गुजर
20. हर्षद जगन्नाथ तांबे
21. शर्वरी अमोल घाटूळे
22. विभूती विक्रांत हिंगे
23. संस्कृती संदीप झगडे
24. आराध्या अरुण सोनटक्के
25. वृषाली अमोल घोडके
26. अविष्कार भाऊसाहेब गिऱ्हे
27. अनन्या अशोक हजारे
28. प्रणव प्रसाद आरू
29. रुद्र अमोल शिंदे तसेच

इयत्ता 9 मधील दुसऱ्या फेरी साठी पात्र झालेले विद्यार्थी खालीलप्रमाणे

1. आर्यन लाळगे
2. श्रेयश दळवी
3. हर्ष दाते
4. ईश्वरी यादव
5. सोहम कानगुडे
6. हर्षद गाडे
7. प्रतीक गायकवाड
8. अभय हंबर्डे
9. समृद्धी मुटकुळे
10. सोहम धस
11. संस्कृती वाळके
12. श्रेयश गरजे
13. सार्थक मुळे
14. गजानन सुंबे
15. ज्ञानदा साप्ते
16. सौरभ बनकर
17. सार्थक पवार
18. प्रथमेश खंडागळे
19. सृष्टी कर्डिले
20. स्वराधी खाडे
21. प्रणव उतेकर
22. सृजन ढोले.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे या यशाबद्दल मराठवाडा भुषण लोकप्रिय आमदार सुरेश (आण्णा) धस साहेब, शाळेचे संस्थापक अध्यक्ष तथा जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस साहेब यांनी अभिनंदन केले.

## "जंगल वाचवा" : "हल्लेखोर प्राण्यांचा" सरकारला सुचक इशारा

बिबट्या शहरात का येतो,याचा अभ्यास सरकारने कधी केला का?सरकारला आताच शेळया का आठवल्या? असे अनेक प्रश्न सध्याच्या परिस्थितीत उपस्थित होत आहे. सध्या राज्यभरात बिबट्याने मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला आहे.नुकताच नागपूरात दिनांक १० तारखेला बिबट्याने ७ जणांना गंभीररित्या जखमी केले.त्यामुळे बिबट्याचे हल्ले रोखण्यासाठी जंगलात १ कोटी शेळया सोडण्याची घोषणा वनमंत्री गणेश नाईक यांनी केली.परंतु प्रश्न निर्माण होतो की एक कोटी शेळया येणार कोठुन आणि आपण कुत्रेच पकडु शकत नाहीत तर एक कोटी शेळया सोडल्याने सरकारला बिबटे सापडतील असे मला वाटत नाही आणि सापडले तर ठेवणार कोठे.कारण विधिमंडळ परिसरात रेड कार्पेटवर भटके कुत्रे बिनधास्त फिरत होते हे कुत्रे पकडण्यास मनपा कर्मचाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली पण कुत्रे पकडण्यात अपयश आले.त्यामुळे आपण कुत्रे पकडू शकत नाही तर बिबटे कसे काय पकडणार हाही मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.आपण जंगल संपदा वाढविली असती आणि जंगल कटाई रोखली असती तर आपल्याला गावात किंवा शहरात बिबट्या किंवा हिंसक पशु दिसलेच नसते हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे बिबट्यासाठी शेळयांचा बळी आणि जंगलतोडीमुळे बिबट्याकडुन शेतकरी, शेतमजूर, गावातील नागरिक, शहरातील नागरिक, पाळीव प्राणी यांचा बळी हे कितपत योग्य म्हणावे! त्याकरिता सरकारने जंगल वाचविले तर सर्वांचाच जीव आपोआप वाचले व सुरक्षित राहील. पर्यावरण प्रेमी, सामाजिक संघटना, गावकरी,राज्यातील नागरिकांना आणि स्वतः निसर्ग जंगल तोडीचा कडाडून विरोध करीत आहेत.तरीही विकासाच्या नावावर किंवा धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड व वृक्षांची कत्तल सुरूच आहे आणि हे संपूर्ण दृश्य सरकार, लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.तरीही जंगल कटाई अजुन पर्यंत थांबलेली नाही.बिबट्या शहरात किंवा गावात धाव का घेत आहेत याची कल्पना सरकार आहे तरी शहरीकरण,औद्योगिकरण, धार्मिकतेच्या नावांवर मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढत आहे.आज राज्यातीलच नाही तर देशातील प्रत्येक शहरांचा विचार केला तर प्रत्येक शहराच्या मुख्य पॉईंट्स पासुन ४० किलोमीटर अंतरापर्यंत शहरीकरण व औद्योगिकरण झालेले आहे.आपण आपल्या सुखसुविधांसाठी जंगल तोडून शहरीकरण केले हे ठीक आहे.परंतु बिबट्या किंवा इतर प्राण्यांचा विचार सरकारने कधी केला का?की त्यांचे काय होईल?या मुक्या पशुपक्ष्यांना कोण अन्नपाणी देयील याचा विचार राज्यातील कोणत्याही सरकारने केलाच नाही.त्याचेच प्रायश्चित्त म्हणजे आज बिबट्यानी राज्यातील प्रत्येक शहरांमध्ये व गावांमध्ये धुमाकूळ घालत आहे.आज बिबट्या आपल्या अन्नासाठी शहरात येतो आणि सरकारला खडबडून जाग येतो, आणि सरकार म्हणते की बिबट्यांचा शहरातील हैदोस पहाता त्यांच्या खाद्यपुर्तीसाठी एक कोटी शेळया जंगलात सोडू.अहो तुम्ही वरच्यावर जंगल कापत रहाल तर शेळया कुठे सोडणार?आपण जर शेळया जंगलात सोडत असाल तर ही तर पाळीव प्राण्यांची हत्याच म्हणावी लागेल. आता शहरीकरण थांबायला तयार नाही, त्यामुळे सरकारने बिबट्यांना पाळीव प्राण्यांचा दर्जा दिला तर बरे होईल.कारण शेळया जंगलात सोडण्यापेक्षा आम्ही घरीच त्यांना जेवण देवू शकतो.सरकारने सर्वच गोष्टींचा गांभीर्याने विचार करने गरजेचे आहे.कारण देशासह राज्यात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे,



बिबट्यांची संख्या वाढत आहे,कुत्र्यांची संख्या वाढत आहे यावर ठोस पाऊल उचलने गरजेचे आहे.सरकारने जर जंगल वाचविले तर बिबट्या किंवा अन्य हिंसक पशु यांना शेळयांची सुध्दा गरज भासणार नाही.सरकार चुकीचा अंदाज लावत आहे की बिबट्या शहरात किंवा गावात येतो.परंतु तसे अजीबात नाही कारण बिबट्या किंवा अन्य पशुपक्षी यांच्या घरांवर आपणच म्हणजे मानवजाती व मुख्यत्वे करून सरकारने अतिक्रमण केले आहे म्हणून बिबट्या सारखे अनेक हिंसक पशु शहराकडे किंवा गावाकडे धाव घेतांना दिसतात व यामुळे जीवीत हाणीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.यात बिबट्याचा काय दोष! बिबट्या हा आपली खाद्यपुर्तीसाठी शहरात येत आहे,म्हणून काय त्यांच्या खांद्यपुर्तीसाठी आपण शेळयांचा वापर करणार काय? म्हणजे एकाचा जीव वाचवण्यासाठी दुसऱ्याचा जीव घ्यायचा हा कुठला न्याय?ही हत्याच म्हणावी लागेल!त्यापेक्षा सरकारने जंगल कटाई व वृक्षतोड थांबविली तर बिबट्यांचेही प्राण वाचतील व शेळयांचा सुध्दा जीव वाचेल.सरकार साधुग्रामसाठी तपोवनातील १८०० झाडांची हत्या करण्याच्या तयारीत आहे.याचा पुढे नाशिककरांसाठी काय विपरीत परिणाम होईल हे आज राज्यातील अनेक भागात बिबट्या दाखवित आहे.त्यामुळे बिबट्यांची वाढती संख्या, जंगल कटाई आणि बिबट्यांच्या खाद्यपुर्तीसाठी शेळयांची पेशकस हे कितपत योग्य आहे याचा सरकारने गांभीर्याने विचार केला पाहिजे व संपूर्ण हिंसक पशुंचे वास्तव जंगलात कसे राहील याचा अभ्यास पुर्वक विचार सरकारने केला पाहिजे.कारण गेल्या काही वर्षांपासून बिबट्या शहरात व गावात येत आहे. याचेच प्रायश्चित्त म्हणून जंगलतोडीमुळे शेतकरी, गुराखी,पाळीव प्राणी यांची आतापर्यंत मोठ्या प्रमाणात जीवित हानी झाली आहे.सरकारने विचार करायला हवा की, मोजक्या बिबट्यासाठी एक कोटी शेळयांचा हत्या करायची हे कितपत योग्य म्हणावे. आपण वनसंरक्षक कायद्यानुसार जंगली पशुंना मारू शकत नाही.परंतु बिबट्यांचा शहरात व गावातील वाढता हैदोस पहाता सर्वसामान्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने व वनविभागाने स्वीकारली पाहिजे.कारण कायदे बनविणारे सरकारच त्यामुळे सरकारने मानव, बिबट्या व शेळयांना वाचविण्याची जबाबदारी स्वीकारावी.फक्त तोंडी आश्वासन देवून चालणार नाही तर ठोस उपाययोजना केली पाहिजे. आपण कायद्यानुसार बिबट्यांला मारूही शकत नाही. त्यामुळे यावर सरकारजवळ एकच उपाय आहे तो म्हणजे जंगल वाचविणे.बिबट्यांना शेळया खाऊ घाला किंवा आणखी काही खाऊ घाला जोपर्यंत जंगलतोड थांबणार नाही तोपर्यंत हिंसक पशुंचे आक्रमक सुरूच राहील सावधान!भिवापूर तालुक्यात वाघांचा मुक्त संचार सुरू असल्याचे गावकरी, शेतमजूर, गुराखी, सामान्य नागरिक सांगत आहेत.याकडे वनविभाग दुर्लक्ष करीत आहे असा भिवापूर वासीयांचा आरोप सुध्दा केला आहे.या गंभीर समस्येकडे भिवापूर तालुक्यातील खरेदी-विक्री संघाने वनमंत्री गणेश नाईक यांना निवेदन सुध्दा दिले आहे.यावरून स्पष्ट होते की हिंसक पशुंचा मुक्त संचार राज्यातील अनेक भागात,जिल्ह्यांत,गाव खेड्यात, शहरात सुरूच आहे.परंतु यावर वनविभागाने अजुन पर्यंत ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही. हल्लेखोर प्राणी आता सरकारला सल्ला देत आहे की, आताही जंगल वाचवा.त्यामुळे वनविभाग व सरकारला आग्रहाची विनंती आहे की, आपल्याला हिंसक पशु पासुन जर सुरक्षित रहायचे असेल तर प्रथम जंगल संपदा वाढविली पाहिजे.जय हिंद!

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# नीतिमत्तेच्या बळावर पत्रकार घडतो; पत्रकारांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी राज्य मराठी पत्रकार परिषद कटिबद्ध - मधुसुदन कुलथे

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर :** लोणी /प्रतिनिधी ज्ञानेश्वर साबळे, प्निर्भीड, प्रामाणिक व जबाबदार पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहित जपणे हीच पत्रकारांची खरी ओळख असून, पत्रकारांच्या प्रश्नांना एकसंघपणे वाचा फोडण्यासाठी संघटन बळकट करणे काळाची गरज आहे. पत्रकारांच्या आडीअडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी राज्य मराठी पत्रकार परिषद सातत्याने प्रयत्न करीत असून, भविष्यात पत्रकारांसाठी अनेक महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे समोर ठेवून परिषद कार्य करणार आहे, असे स्पष्ट प्रतिपादन राज्य मराठी पत्रकार परिषद केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे यांनी केले.

राज्य मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्र प्रदेश व अहिल्यानगर पत्रकार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने संवाद वाढविणे, संघटन बळकटी साधणे तसेच आगामी काळातील उपक्रमांची दिशा ठरविण्यासाठी अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आलेली महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत पत्रकारांच्या सद्यस्थितीवर, त्यांच्या दैनंदिन अडचणींवर, सामाजिक व आर्थिक समस्यांवर तसेच भविष्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांवर सखोल चर्चा करण्यात आली.

आज बदलत्या काळात पत्रकारांना अनेक आडीअडचणींना सामोरे जावे लागत आहे. आर्थिक असुरक्षितता, नियमित उत्पन्नाचा अभाव, आरोग्यविषयक सुविधा नसणे, विमा संरक्षणाचा प्रश्न, काम करताना सुरक्षिततेची हमी नसणे, तसेच शासन स्तरावर योग्य तो सन्मान व सुविधा मिळत नसणे, अशा विविध समस्या पत्रकारांसमोर उभ्या आहेत. ग्रामीण भागातील पत्रकारांना तर या अडचणी अधिक तीव्रतेने भेडसावत असल्याचे यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले. या सर्व प्रश्नांची दखल घेत राज्य मराठी पत्रकार परिषद संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांसाठी ठोस उपाययोजना राबविणार असल्याचा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.



या बैठकीत शहाजी सुखदेव दिघे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पत्रकार हा समाजाचा एक महत्त्वाचा स्तंभ असून लोकशाहीचा चौथा आधार म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. मात्र प्रत्यक्षात पत्रकारांना आवश्यक त्या सेवा-सुविधांचा व संरक्षणाचा अभाव आजही जाणवतो. अनेक पत्रकार आर्थिक, सामाजिक व सुरक्षिततेच्या समस्यांशी झुंज देत आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून पत्रकारांसाठी आरोग्य सुविधा, विमा संरक्षण, निवास योजना, आर्थिक सक्षमीकरण व आपत्कालीन मदत यासारख्या बाबी प्रत्यक्षात आणण्यासाठी राज्य मराठी पत्रकार परिषद कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकारांच्या आडीअडचणी केवळ मांडून थांबणे नव्हे तर त्या सोडविण्यासाठी ठोस कृती करणे हे परिषदेचे धोरण आहे. पत्रकारांना मान-सन्मान मिळावा, त्यांच्या कामाची योग्य दखल घेतली जावी व सुरक्षित वातावरणात काम करता यावे, यासाठी संघटना सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करणार आहे. संघटन मजबूत झाल्यास पत्रकारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडता येतील, हा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

राज्य मराठी पत्रकार परिषद आज महाराष्ट्रभर विस्तारली असून, ग्रामीण ते शहरी भागातील मोठ्या संख्येने पत्रकार परिषदेत सहभागी होत आहेत. वाढत्या सदस्यसंख्येमुळे पत्रकारांच्या हक्कांसाठी एकत्रित लढा उभारण्याची ताकद निर्माण झाली आहे. आगामी काळात पत्रकार भवन उभारणी, प्रशिक्षण कार्यशाळांचे आयोजन, नवोदित पत्रकारांसाठी मार्गदर्शन, तसेच विविध कल्याणकारी योजना राबविण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. पत्रकारांसाठी स्वतंत्र आर्थिक व्यवस्था उभी करण्याच्या दृष्टीने बँक स्थापनेचा विचार हा दीर्घकालीन पण अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. राज्य मराठी पत्रकार परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष मधुसूदन कुलथे यांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना अधिकृत नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. या प्रसंगी डॉ. तान्हाजी रावजी लामखडे (मामा) – केंद्रीय संघटक, प्रशांत रावसाहेब टेके पाटील – प्रदेश संपर्कप्रमुख, तसेच शहाजी सुखदेव दिघे – जिल्हाध्यक्ष, राज्य मराठी पत्रकार परिषद अहिल्यानगर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रदेश संपर्कप्रमुख प्रशांत रावसाहेब टेके पाटील यांनी पत्रकारांना भेडसावणाऱ्या अडीअडचणी सोडविण्यासाठी जास्तीत जास्त पत्रकारांनी संघटनेत सहभागी होण्याचे आवाहन केले. संघटनेच्या माध्यमातूनच पत्रकारांच्या प्रश्नांना न्याय मिळू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.एकंदरित, ही बैठक केवळ संघटनात्मक न राहता पत्रकारांच्या भवितव्यासाठी दिशादर्शक ठरली. पत्रकारांच्या हक्कांसाठी, सन्मानासाठी व सुरक्षित भविष्यासाठी राज्य मराठी पत्रकार परिषद अधिक जोमाने कार्य करणार असून, पत्रकारांच्या आडीअडचणी सोडविण्यासाठी संघटना सदैव त्यांच्या पाठीशी उभी राहील, असा ठाम विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

## ओम परमहंस सद्‌गुरु श्री . यशवंत बाबा महाराज यांच्या पंढरपूरकडे जाताना व येताना पायी वारीचे दर्शन अनेक भाविकांनी घेतले"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर) :** सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील सिद्धेश्वर कुरवली या ठिकाणी असलेल्या ओम परमहंस सद्गुरु श्री यशवंत महाराज यांची यांची प्रतिमा सजविलेल्या बैलगाडीच्या रथातून पायी दिंडीची परंपरा अनेक वर्षापासून सिद्धेश्वर कुरवली ते पंढरपूर अशी दिंडी सोहळ्याच्या माध्यमातून आहे. सदर पायीदिंडी सातारा -पंढरपूर महामार्गावरून पंढरपूरला जात असते व याच मार्गावरून पुन्हा सिद्धेश्वर कुरवली गावाकडे 'यशवंत हो, जयवंत हो'या जयघोष यामध्ये टाळ मृदुंगाच्या गजरात व गावोगावी कीर्तन रुपी सेवा देत येत जात असते. त्यावेळी या पायी दिंडी सोहळ्याचे जाताना आणि येताना दोन्ही वेळेस अनेक गावांमधून अनेक भाविक भक्त



स्वागत करीत असतात व मनोभावे दर्शन घेत असतात. पंढरपूरला जातेवेळी पिलीव ता माळशिरस या ठिकाणी रयत शिक्षण संस्थेचे कै. रमेश खलीपे कनिष्ठ महाविद्यालय व कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या वतीने विद्यालयाच्या पटांगणात भव्य दिव्य स्वरूपात राहण्याची व निवासाची व्यवस्था करण्यात आलेली होती. यावेळी सुतार व इतर परिवाराच्यावतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आल्याचे कळते. तर परतीच्या प्रवासात सिद्धेश्वर कुरवली कडे दिंडी सोहळा जातेवेळी गेल्या अनेक वर्षापासून या पायी दिंडीची सेवा करणारे डॉ. दिलीप पवार व सौ डॉ. वंदना पवार यांनी कृषीनिष्ठ कै. मारुतीराव पवार बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने रथाचे पूजन करून भाविकांच्या अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. यावेळी भाविक भक्तांनी समाधानाने आशीर्वाद देऊन दिलेले सेवेबद्दल सर्व पिलीव ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले.

---

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समता सैनिक दलाच्या नागपूर येथील परेड ला भेट दिली

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/नागपूर-** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समता सैनिक दलाच्या नागपूर येथील परेडला भेट दिली.आणि एसएसडी विषयी उस्तुकतेने माहिती विचारली . यावेळी समता सैनिक दल विषयी आणि उपवर्गीकरण क्रेमिलेयर हे संविधान विरोधी आहे अशे एड .स्मिता कांबळे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधताना सांगितले .उपवर्गीकरन करण्यासाठी राज्य सरकारने गठित केलेली अनंत बदर समिती त्वरित रद्द करण्यात यावी आणि



क्रिमिलेयर विरोधी करण्यात येत असलेली चर्चा देखील थांबवावी अशी जोरदार मागणी समता सैनिक दलाच्या एड स्मिताताई कांबळे ,विश्वास पाटील , आनंद पिल्लेवान , राजेश लांजेवार ,टार्झन ढवळे ,अरुण भारशंक ,सहित समस्त समता दलाच्या सैनिकांनी आज दिक्षाभूमी येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली.या विषयावर समता सैनिक दलाच्या शिष्टमंडळांना आपण माझ्यापर्यंत या सविस्तर चर्चा करू अस अश्वासीत एकनाथ शिंदे यांनी केले.

यावेळी समता सैनिक दलाच्या शिष्टमंडळाने समता सैनिक दल संपादित भारतीय संविधानाची प्रत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले.

---

## 21 लाख 74 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गुंतवणूक केलेल्या रकमेवर कोणताही नफा आणि गुंतवणूक केलेली रक्कम परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी सहा अनोळखी इसमाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 11 डिसेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुजवा चक्रवर्ती हे रोडपाली, कळंबोली, सेक्टर 16 येथे राहत असून ते फिल्म इंडस्ट्री मध्ये पोस्ट प्रोडक्शन मार्केटिंग करतात. त्यांना इंस्टाग्रामवर शेअर मार्केट ट्रेंडिंग संदर्भात जाहिरात दिसली. त्या लिंकवर क्लिक केले असता त्यांना व्हाट्सअप ग्रुपवर ॲड करण्यात आले. यावेळी ट्रेंडिंग करायचा असल्यास ॲप वर पैसे टाकावे लागतील असे सांगितले. त्यावेळी त्यांनी पैसे इन्व्हेस्ट केले आणि ट्रेडिंग सुरू केली. त्यांना दहा हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर त्यांनी 25000 रुपये पाठवले आणि त्यांना एक लाख रुपये नफा मिळाला. पैसे अकाउंट वर येतात का हे पाहण्यासाठी त्यांनी बँक खात्यावर रक्कम ट्रान्सफर केली. ते त्यांच्या बँक खात्यावर दिसले. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला आणि त्यांनी आणखी पैसे ट्रान्सफर केले. त्यांना लाखांचा नफा दिसत होता. त्यांनी एकूण 21 लाख 74 हजार रुपये जमा केले असता ॲपवर एक करोड रुपये दिसून आले. पैसे ट्रान्सफर करण्याचा प्रयत्न केला मात्र ते ट्रान्सफर झाले नाहीत. त्यावेळी तुम्हाला दहा लाख रुपये कमिशन भरावे लागतील त्यानंतर ते पैसे खात्यावर जमा होतील असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

---

## भूसंपादन करतांना अन्याया झाल्याने शेतकऱ्यांनी दिले कार्यकारी अभियंता याना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पेण प्रतिनिधी/दीपक लोके :** पेण तालुक्यातील पुर्व विभागात हेटवणे डावा तिर कालवा मध्ये भूमीगत पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू केल्याने या भागातील उन्हाळी भात शेती व भाजीपाला करणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालं आहे. भूमिगत पाईप लाईनच टाकत असल्याने या पाण्याचा उपयोग जर व्यवसायिक काम करता उपयोग होत असेल तर शेतकऱ्यांचा विरोध राहील गेल्या अनेक वेळा हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यालयात शेतकरी अर्ज दाखल करून कोणत्याही प्रकारचे मागण्या आजपर्यंत मान्य केल्या नाहीत त्यामुळे विविध मागण्यांसाठी हेटवणे डावा तिर कालवा संपादित संघर्ष



शेतकरी यानी सोमवारी दि 15 रोजी हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यलयाचे कार्यकारी अभियंता याना निवेदन दिले आहे.

गेल्या अनेक वर्षे शेतकऱ्यांचे मागण्या प्रलंबित आहेत व आजपर्यंत कोणतेच उत्तर समाधानकारक आले नाहीत तरी सुद्धा शेतकऱ्यांच्या मागण्या प्रलंबित असून सुद्धा भूमीगत पाईप लाईनचे काम सुरू आहे सार्वजनिक कामाला आमचं विरोध नाही परंतु आम्ही केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात. संपुर्ण कालव्याचे सयुक्तिक मोजणी करणे, भूसंपादन मध्ये आलेले नवीन सर्व्हे नंबर व जुने सर्व्हे नंबरचे काही क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करून मोबदला देणे , संपादित जागेच्या शेतकऱ्यांचा शिल्लक मोबदला देवून नव्याने निवाड्याची प्रक्रिया पूर्ण करणे या प्रलंबित मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी तस प्रकारचे निवेदन हेटवणे मध्यम प्रकल्प कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांना दिले तसेच जिल्हाधिकारी, प्रातअधिकारी , कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सहाय्यक अभियंता, तहसीलदार, पेण पोलीस ठाणे, या कार्यालयाना सुध्दा निवेदन देण्यात येणार आहोत असे शेतकऱ्यांन कडून सांगण्यात आले आहे,

जर शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यां पुर्ण केल्यास तसेच शेतकऱ्यांन सोबत मिटींग लावून प्रलंबित मागण्याचे प्रश्न सोडवले तर कोणत्याही प्रकरचा आक्रोश राहणार नाही जर मागण्या हेटवणे मध्यम प्रकल्पाने पूर्ण नाही केल्यास मोठा उद्रेक होईल त्यांची सर्वस्वी जबाबदारी हेटवणे मध्यम प्रकल्पाची असेल शेतकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे.

यावेळी महाराष्ट्र पोल्ट्री योद्धा संघटनेचे अध्यक्ष अनिल खामकर, दिपक पाटील, देवदास नाईक, राकेश उतेकर, जगदीश उतेकर, विनोद बामुगडे, आनंद भावे, स्वप्नील खामकर, लक्ष्मण निरगुडा आदी शेतकरी उपस्थित होते.

---

## शिस्त आणि सर्वांगीण शैक्षणिक सुविधा यांमुळे शाळेचा आलेख वाढतोय - दिपीका पाटील

### रांगोळी व चित्रकला प्रदर्शन कार्यक्रमाचे आकर्षण ठरले

**दैनिक युवक आधार**

**पेण (दीपक लोके) :** शाळांमध्ये असणारी शिस्त आणि सर्वांगीण शैक्षणिक सुविधा यांमुळे सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजच्या शाळांचा विद्यार्थ्यांचा तसेच गुणवत्तेचा आलेख दिवसेंदिवस वाढत असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्था सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजच्या उपाध्यक्षा दिपीका पाटील यांनी पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी केले. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष ॲड पी डी पाटील, चिटणीस राजेश पाटील, सदस्य नरेंद्र पाटील, आप्पा धनावडे, धीरज पाटील, सतिश तेलंगे, प्राचार्य एस एच नाईक, उपमुख्याध्यापक आर आर पाटील, पर्यवेक्षक एस एस मोरे,कार्याध्यक्षा एन एम घाडगे, शिक्षक प्रतिनिधी पी पी पाटील, शिक्षिका प्रतिनिधी ए डी कोळी, डी के पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी आदर्श मोकल, नव्या पाटील, तन्वी म्हात्रे, प्रेम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या सार्वजनिक विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संस्थेचे अध्यक्ष ॲड पी डी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी रांगोळी आणि चित्रकला प्रदर्शन हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेच्या उपाध्यक्षा दिपीका पाटील यांनी आपल्या संस्थेच्या शाळेतील शिस्त तसेच विविध कलागुणांना दिला जाणारा वाव या सर्व गोष्टींमुळे




विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आणि विविध स्तरातील आलेख वर्षानुवर्ष वाढतच असल्याचे सांगून हा आलेख असाच वाढता ठेवा आम्ही तुमच्यासाठी असेच विविधांगी उपक्रम तुमच्या उज्वल भवितव्यासाठी राबवत राहू असे सांगितले. तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्राचार्य एस एच नाईक यांनी आजचा हा कार्यक्रम म्हणजे नुसता कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्वाचे व्यासपीठ असून वर्षभरातील त्यांच्या सप्तगुणांचा सोहळा आहे. या संस्थेमध्ये शिस्त आणि शैक्षणिक व भौतिक सोयी यांसाठी आमचे सर्व शिक्षक अहोरात्र प्रयत्न करत आहेत आणि त्याला संस्थेचे अध्यक्ष व पूर्ण समिती यांची मोलाची साथ असते असे सांगितले. यावेळी रांगोळी आणि चित्रकला प्रदर्शनातून चालू घडामोडी तसेच महिला सुरक्षा, प्लास्टिक बंदी जनजागृती, विविध महापुरुष, विविधतेत एकता, धार्मिक संस्कृती, पर्यावरण आदी गोष्टींचा समावेश करण्यात आला होता. या कार्यक्रमादरम्यान विविध शिक्षकांना वेगवेगळ्या क्षेत्रातील आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते ज्ञानप्रभा स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

---

## जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थांचा 20 वर्षानंतर स्नेहमिलन सोहळा

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा-** पवनी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा चिचाळ येथे वर्ग १ ते १० वी पर्यंत शिक्षण घेतलेल्या १९९० च्या बॅच चे विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व मित्रांनी पाचवा स्नेहमिलन सोहळा एकत्र येत साजरा केला आपल्या संसारातून नोकरी धंद्यातून उसंत काढत सर्व मित्र एकत्र येत आपल्या शालेय जीवनाच्या आठवणीत हरवून गेले सर्व काही विसरून बालपणीचा विविध खेळ खेळून देहभान विसरून बालवयात रममाण झाले गरीब श्रीमंत उच्चशिक्षित किंवा शेती व्यवसायात असलेल्या सर्वच मित्रांना एकत्रित करण्यासाठी आणि सामाजिक आर्थिक शैक्षणिक सांस्कृतिक आणि आपली नाती आपली माती याच अभिमान समोर ठेवत एकत्र येण्याचं आणि एकत्र राहायचं ठरवून त्यांना मदत करण्यासाठी गर्दीच्या दुनियेत न हरवला मित्र म्हणून एकत्र येण्याचा प्रेरणादाई संकल्प करण्यात आला. ह्या स्नेहमीलन सोहळयासाठी प्रा. नीलकमल उके, प्रा. राजेश नंदपुरे, प्रा. महेंद्र काटेखाये. नरेंद्र बिलवणे माजी पंचायत समिती सदस्य सुधाकर




भानारकर, केंद्र प्रमुख कृष्ण जिभकाटे, संजय नखाते ,सुरेश काटेखाये ,माजी जी. प. सदस्य माधव नेवारे ,सुरेश पडोळे यांनी मोलाची भूमिका बजावली. ह्या स्नेहमीलन सोहळयास सर्व मित्रांनी सहकार्य केले.